पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२१ ■ रविवार, दि.३१ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठ ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# लोतखेड–म्हैसांग परिसरात 1 कोटींच्या रेतीवर दरोडा

## दर्यापूर तहसीलदारांचे दुर्लक्ष का ?, 'पूर्णा' पात्राची ऐशीतैशी

## आर.आर.सी.च्या बातमीनंतर माफियांचे ६ डोंगे, ३ पोकलेन आणि १० मोठे ट्रक लंपास !



आधी



आता

प्रतिनिधी ३१ मे

**अकोला / दर्यापूर :** अकोला आणि अमरावती जिल्ह्याच्या सीमाभागातील पूर्णा नदीचे पात्र सध्या वाळू माफियांचे नंदनवन बनले असून, लोतखेड आणि म्हैसांग घाटावरून तब्बल १ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची रेतीवर उघड्या डोळ्यांनी दरोडा टाकल्या गेल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. कोणत्याही प्रकारचा अधिकृत लिलाव नसताना, नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या महालूटमारीकडे दर्यापूरच्या तहसीलदारांनी दुर्लक्ष का केले ? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

शनिवारी आर.आर.सी. च्या बातमीनंतर घाटावरून माफिया पळून गेले असले, तरी त्यांनी आपली यंत्रसामग्री सुरक्षित स्थळी हलवल्याने संशय अधिक बळावला आहे. अशी माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. हे सर्व वाहने जप्त करत, म्हैसांगचा रस्ता त्वरीत दूरुस्त करुन देण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. म्हैसांग ग्रामस्थांनी तक्रार करुन त्याकडे दूर्लक्ष करणारे दोन्ही जिल्ह्यातील अधिकारी कोण याचा ही शोध जिल्हाधिकाऱ्यांनी घेण्याची गरज आहे. या विषयी दर्यापूर तहसिलदार यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी मोबाईल रिसिव्ह केला नाही.



### रेती दरोड्यात कोणाचा हात ओले

आपल्या हद्दीत १ कोटींची रेती चोरीला जात असताना ढिम्म राहिलेल्या दर्यापूर तहसीलदारांची आणि स्थानिक तलाठ्यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होणार का ?. घाटावरून पळवून नेलेले ६ डोंगे, ३ पोकलेन आणि १० मोठे ट्रक नेमके कुठे लपवून ठेवले आहेत, याचा शोध घेऊन खनिकर्म विभागाने ते तात्काळ जप्त करावेत. अकोला आणि अमरावती जिल्हा प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून नदीपात्रातील बेकायदेशीर खड्ड्यांचा पंचनामा करावा आणि वाळू माफियांच्या मुसक्या आवळून त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे. पूर्णा नदीच्या पात्रातील या उघड्या लूटमारीमुळे नदीचे पर्यावरण पूर्णपणे उद्धवस्त झाले असून, भूजल पातळी खालावण्याचा धोका निर्माण झाला आहे. आता अकोला व अमरावती जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी यात स्वतः लक्ष घालून दोषी अधिकारी आणि माफियांवर कठोर बडगा उगारला नाही, तर परिसरातील ग्रामस्थ तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत.



### ६ डोंगे, ३ पोकलेन आणि १० मोठे ट्रक गायब करण्यात माफिया यशस्वी !

नदीपात्रात अवजड यंत्रांचा वापर करण्यास कायद्याने सक्त मनाई असताना, लोतखेड व म्हैसांग घाटावर ६ मोठे डोंगे (बोटी) आणि ३ पोकलेन यंत्रांच्या साहाय्याने पूर्णा नदीचे पात्र अक्षरशः खोदून काढले जात होते. दररोज रात्री-अपरात्री शेकडो टिप्पर व १० मोठ्या ट्रकमधून कोणतीही रॉयल्टी न भरता वाळूची अवैध वाहतूक सुरू होती. विशेष म्हणजे, आर आर सी न्यूजवर बातमी प्रसारीत होताच कारवाई होण्यापूर्वीच माफियांनी ६ डोंगे, ३ पोकलेन आणि १० मोठे ट्रक घटनास्थळावरून गायब (लंपास) केले. कारवाईची माहिती माफियांना आधीच कोणी दिली ? हा 'माहितीचा स्त्रोत' महसूल विभागातच तर नाही ना, अशी शंका घेतली जात आहे.

### महसूल यंत्रणा सुस्त की 'मस्त'? ग्रामस्थांचा थेट आरोप

'हा सगळा प्रकार स्थानिक महसूल अधिकारी, पोलीस आणि जिल्हा प्रशासनाच्या अभद्र युतीमुळेच सुरू आहे,' असा थेट आरोप लोतखेड आणि म्हैसांग येथील स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. लिलाव नसलेल्या गट नंबरमधून दिवसाढवळ्या कोट्यवधींची वाळू उपसली जात असताना, दर्यापूर तहसीलदार आणि अकोल्याच्या महसूल यंत्रणेला याची कुणकुण कशी लागली नाही ? अधिकारी केवळ सुस्त आहेत की त्यांचेही हात यात ओले झाले आहेत, यावरून आता तर्कवितर्कांना उधाण आले आहे. कोट्यावधीची रेती चोरल्या जात असताना लाखोंची रॉयल्टी वसुल न करता झालेल्या या उद्योगामागे कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मनोज जरांगे यांनी उपोषण घेतले मागे !

प्रतिनिधी ३१ मे

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी ३० मे रोजी सकाळी १० वाजतापासून आमरण उपोषण सुरु केले होतं. त्यानंतर रात्रीच मराठा आरक्षण अभ्यासक आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात सकारात्मक चर्चा झाली. अभ्यासकांच्या सूचवलेल्या दुरुस्त्या सरकारने मान्य केल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी रात्री १०.३० वाजता जरांगे पाटलांची भेट घेतली. सकारात्मक चर्चेनंतर मनोज जरांगेंनी मध्यरात्री १.१५ वाजता पाणी पिऊन उपोषण मागे घेतले. मनोज जरांगेंनी आमरण उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांना जी आश्वासन दिली आहेत, ती सर्व तुमच्या समोर (माध्यमांसमोर) दिली. कोणतेही आश्वासन मागे दिलेलं नाही. आम्ही दिलेली आश्वसनं मनोज जरांगे यांनी देखील वाचून दाखवली आहेत. सातत्याने मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका आमच्या सरकारने घेतली आहे, त्यानुसारच कारवाई केलेली आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.



### मनोज जरांगेंच्या या मागण्या मान्य

५८ लाख नोंदींचे दस्तावेज जरांगेंना दिले जाणार, नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देणार, जात पडताळणीसाठी विभागीय आयुक्त १५ दिवसांत बैठक घेणार, सातारा गॅझेटसाठी सरकारला आणखी एक महिना वेळ, न्या.शिंदे समितीला एक वर्षांची मुदतवाढ, प्रमाणपत्र वैधतेसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन, आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष विखे-पाटलांचीही स्वतंत्र हेल्पलाईन, मंत्रालयात मराठा आरक्षण कक्ष स्थापन होणार.

### ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही- बबनराव तायवाडे

मनोज जरांगे यांच्या मागण्यांना घेऊन राज्य सरकार दोन दिवसात शासन आदेश काढणार आहे. मात्र आमच्या संविधानिक आरक्षणाला धक्का लागणार नसल्याने आम्ही आश्वस्त असल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी सांगितले. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याचा पुनरुचार केला की ओबीसींच्या आरक्षणाला कुठलाही धक्का लागणार नाही, एका समाजाला न्याय देण्यासाठी दुसऱ्या समाजावर अन्याय करणार नाही.

### मनोज जरांगेचे आंदोलन म्हणजे एक दिवसाची एकांकिका- हाके

मनोज जरांगेचं आंदोलन एक दिवसाची एकांकिका होती. मनोज जरांगे बिहार चित्रपटातील रीलस्टार आहेत. मनोज जरांगेंना राजकारणाचे वेध लागले आहेत. प्रसाद लाड यांच्या मदतीने त्यांना पक्ष स्थापन करून विजय थलपती व्हायचं आहे. आज महाराष्ट्र सरकार लाचार होताना पहिले. राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांना ओबीसी जागा दाखवणार, अशी टीका ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केली.

# मुलीला वाचवायला गेलेले ५ जण बुडाले

मुलगी वाचली

वृत्तसंस्था ३१ मे

**कुर्नूल :** आंध्र प्रदेशच्या कुर्नूल जिल्ह्यात शनिवारी संध्याकाळी जे घडलं, ते शौर्य, माणुसकी आणि दुर्दैवी घटनेची हृदयद्रावक कहाणी आहे. याठिकाणी एक अल्पवयीन मुलगी तुंगभद्रा नदीत पडली होती, तिला वाचवण्यासाठी ५ जणांनी नदीत उडी घेतली. मात्र पाण्यात बुडून या पाचही जणांचा मृत्यू झाला आणि ती मुलगी सुखरूप बचावली. पाण्यात बुडणारे लोक आसपासच्या गावातील रहिवासी असून रेस्क्यू टीमकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी साडे चारच्या सुमारास ही घटना घडली. मंत्रालयम परिसरात वाहणारी तुंगभद्रा नदी किनारी काही लोक फिरत होते. त्यावेळी एक अल्पवयीन मुलगी नदी किनाऱ्यावर तिचे पाय धुवत असताना अचानक तिचा तोल गेला आणि ती नदीत पडली. पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे ती मुलगी वाहू लागली. नदीत बुडणाऱ्या मुलीला पाहून परिसरात गोंधळ उडाला. कुणाकडेही विचार करण्याचा वेळ नव्हता. मुलीचा जीव धोक्यात होता तिला वाचवण्यासाठी काही लोकांनी नदीत उडी घेतली.




# दिल्लीत दहशतवादी मॉड्युल उद्ध्वस्त ; 8 अटकेत

वृत्तसंस्था ३१ मे



**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने शनिवारी पाकिस्तान समर्थित आयएसआय-अंडरवर्ल्ड दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करत नेपाळी नागरिकासह आठ जणांना अटक केली. हे सर्व दिल्ली, मुंबई, पंजाब, चंदीगडसह देशात अन्यत्र हल्ले करणार होते.

तपासात गँगस्टर ते हँडलर बनलेला शहजाद भट्टी याच्या सहभागाचा संशय समोर आला आहे. या कारवाईत चार पाक बनावटीचे हँड ग्रेनेड, दोन ग्लॉक पिस्तुले, २४ काडतुसे, चोरीची मोटारसायकल, दुचाकी जप्त केली आहे. दिल्ली पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना मुंबईतील कुर्ल्यात अटक केली. तौकीर आणि अरबाज अशी यांची नावे आहेत. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या काही जणांनी मुंबईत विस्तृत रेकी केली होती. त्यांनी मुंबईतील दादर रेल्वे स्थानक, अनेक पूल व महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी केली होती.

# मराठा आंदोलकाच्या कारला अपघात; एक ठार, दोघे गंभीर

प्रतिनिधी ३१ मे

**बीड :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे सुरू असलेले आंदोलन संपवून इंदापूरकडे परत जाणाऱ्या मराठा आंदोलकांवर बीडमध्ये काळाने भीषण घाला घातला आहे. परतीच्या प्रवासादरम्यान आंदोलकांच्या चारचाकी वाहनाने एका उभ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात इंदापूर येथील एका मराठा आंदोलकाचा जागीच मृत्यू झाला असून, इतर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. इंदापूर तालुक्यातील रामचंद्र शंकर जमदाडे हे आपले सहकारी संतोष माने आणि बिपीन मोरे यांच्यासह अंतरवाली सराटी येथे गेले होते. आंदोलन संपवून रात्री उशिरा कारने घरी परतत असताना, बीडमधील मांजरसुंबा येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रकला त्यांच्या चारचाकी वाहनाने पाठीमागून भीषण धडक दिली.



## लाडक्या बहिणींनी भूलथापांना बळी पडू नये! लाभार्थ्यांना आवाहन

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी ई-केवायसी करणे आवश्यक होते. ज्या लाभार्थ्यांनी निर्धारित मुदतीत ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांचे योजनेअंतर्गत मिळणारे लाभ बंद करण्यात आले आहेत.

ई-केवायसी संदर्भात शासनाकडून किंवा महिला व बाल विकास विभागाकडून कोणतेही नवीन निर्देश अथवा अद्ययावत माहिती प्राप्त झाल्यास ती अधिकृत माध्यमांद्वारे तसेच वर्तमानपत्रांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येईल. मात्र, काही व्यक्ती लाभार्थी महिलांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देत आहेत. ३०० रुपये भरून ऑनलाइन तक्रार दाखल करावी लागते, ती तक्रार मंत्रालयात पाठविली जाते व त्यानंतर लाभ पुन्हा सुरू होतात, अशा प्रकारच्या खोट्या आश्वासनांद्वारे महिलांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. लाभार्थी महिलांनी अशा अफवा, भूलथापा किंवा अनधिकृत व्यक्तींच्या सांगण्यावर विश्वास ठेवू नये.

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली. अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले.

बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासनकौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

सन १७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले. त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्या विषयी अपार आदर निर्माण झाला. 'राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे' हा त्यांचा मूलमंत्र होता.



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे. या योजनेअंतर्गत महिलांनाः स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरुंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करुन त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता.

अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते. अहिल्यादेवींना 'पुण्यश्लोक' ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच 'पुण्यश्लोक' म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात 'लोकमाता' म्हणून जिवंत आहेत. महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण 'अहिल्यानगर' असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे. आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर ९७०२८५८७७७

## मुक्या जीवांची तहान भागवणारा माणुसकीचा हात!



**अकोल्यातील सुनील कल्ले भूतदयावादी उपक्रम**

**अकोला :** जिल्ह्यात उष्णतेने उच्चांक गाठला असताना मुक्या जीवांची तहान भागवण्यासाठी अकोल्याचे सुनील कल्ले सरसावले आहेत. शहरासह ग्रामीण भागात पक्षी आणि वन्य प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करीत त्यांनी मानवतेचा अनोखा संदेश दिला आहे.

अकोला जिल्ह्यात उष्णतेचा कहर वाढत चालला असून तापमानाने तब्बल ४६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. प्रचंड उकाड्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना गावलागतचे वन्य प्राणी आणि पक्ष्यांची अवस्था मात्र अधिक बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत अकोल्यातील सामाजिक कार्यकर्ते सुनील कल्ले यांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. अकोला शहरासह ग्रामीण भागातील विविध ठिकाणी त्यांनी पक्षी आणि वन्य प्राण्यांसाठी पाण्याची पात्रे ठेवण्यास सुरुवात केली आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या पक्षी आणि प्राण्यांना दिलासा मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. सुनील कल्ले हे स्वतः विविध भागात जाऊन झाडांच्या सावलीत, मोकळ्या जागांमध्ये तसेच प्राणी-पक्ष्यांची वर्दळ असलेल्या परिसरात पाण्याची व्यवस्था करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे नागरिकांकडूनही कौतुक होत असून अनेकांनी या उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांनीही आपल्या घराबाहेर पक्ष्यांसाठी पाण्याची छोटी भांडी ठेवावीत, असे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे.

## महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे वतीने ३१ मे पासून तंबाखू विरोधी सप्ताह

**अकोला :** तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा अकोला चे वतीने दिनांक ३१ मे २०२६ ते ६जून २०२६ पर्यंत तंबाखू विरोधी जनजागृती सप्ताह ' तंबाखूला नकार द्या आणि आरोग्याला होकार द्या ' अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक बबनराव कानकिरड यांनी दिली.

तंबाखूचे सेवन आरोग्यासाठी घातक ठरू शकते तंबाखू सेवनाने किंवा धूम्रपानामुळे व्यक्तीच्या मानसिक तसेच शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.तंबाखूचे विघातक दुष्परिणाम माहीत असूनही मोठ्या संख्येने लोक फसव्या जाहिरातीला बळी पडून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करतात. गुटखा, बिडी, सिगारेट इत्यादींच्या सेवनाने अनेक आजाराचा धोका सतत वाढत आहे. विशेषता युवकांमध्ये व्यसनांची सुरुवात किशोर वयात होते. इतरांचा प्रभाव, समाज माध्यमे, बेरोजगारी,ताण तणाव,कौटुंबिक समस्या, भावनिक आधारांचा अभाव आणि तंबाखूजन्य पदार्थांची सहज उपलब्धता यामुळे गुटखा, मावा, इ सिगारेट्स आणि इतर पदार्थांचे आकर्षण युवकांमध्ये वाढणे ही राष्ट्राच्या भवितव्यासाठी चिंताजनक बाप ठरत आहे. या विषयांचे परिणाम केवळ व्यक्तिपूरते मर्यादित न राहता व्यसनामुळे शिक्षण खंडित होणे, बेरोजगारी वाढणे, हिंसाचार, गुन्हेगारीत वाढ,मानसिक आरोग्य समस्या,कुटुंबीय ताणतणाव आणि आरोग्यावरील आर्थिक भार वाढतो. तंबाखूचे व्यसन हा आरोग्यासोबतच सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय विकासाच्या संबंधित गंभीर प्रश्न बनला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने जगभर ३१ मे हा दिवस तंबाखू सेवनविरोधी दिन साजरा केला जातो. यावर्षीची थीम आहे 'आकर्षणाचा बुरखा फाडणे: निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनांचा सामना करणे ' किशोरवयीन मुलांमध्ये व्यसन लागू नये यासाठी या अभियानातून किशोरवयीन मुले, युवकांमध्ये व्यसनविरोधी कार्यशाळा घेणे, व्यसनमुक्ती वर चर्चासत्र आयोजित करणे, तंबाखू विरोधी पोस्टर प्रदर्शन आयोजित करणे, पत्रके वाटणे इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात.

जागतिक तंबाखू दिन केवळ एका दिवसापुरता साजरा न करता तंबाखूच्या वापराच्या विनाशकारी परिणामा चो संघर्षासाठी एक व्यसनमुक्त विचारांची तरुण पिढी संघटित करणे हा या मागचा उद्देश आहे. तंबाखू वापराच्या परिणामाबद्दल जागरूकता निर्माण करून लोकांना धूम्रपान सोडण्यास प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र नशाबंदी मंडळ,विविध संस्था, संघटना, शासन, समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष व जिल्हा शल्य चिकित्सक, युवक मंडळांसोबत समन्वय साधून तंबाखू सेवन विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या मार्फत टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा

प्रतिनिधी ३१ मे

**पाणी टंचाईच्या काळात सेवाभावी उपक्रम**



**आलेगाव :** येथे भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या मार्फत नागरिकांसाठी मोफत टँकरद्वारे पाणी वाटप उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आज या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले असून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. आलेगाव परिसरात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून अनेक माय-माऊलींना रात्री उशिरापर्यंत पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. नागरिकांच्या विनंतीला प्रतिसाद देत सामाजिक बांधिलकी जपत निलेश कापकर यांच्या पुढाकारातून हा मोफत पाणी वाटप उपक्रम सुरू करण्यात आला आहे. रात्री १२ वाजता सुद्धा पाण्याअभावी त्रस्त असलेल्या नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. 'सेवा हीच आमची ओळख' आणि 'कामं बोलतंय कामं' या भूमिकेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, आमचे समाधान काका गवळी हे स्वतः टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी आले असताना शेत परिसरात अचानक टँकरवरून त्यांचा पाय घसरून ते खाली पडले.

### दिन विशेष

## जागतिक तंबाखू विरोधी दिन : तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करूया

दरवर्षी ३१ मे रोजी जगभरात जागतिक तंबाखू विरोधी दिन (World No Tobacco Day) साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांच्या पुढाकाराने साजरा होणाऱ्या या दिनाचा मुख्य उद्देश तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या गंभीर आरोग्यविषयक दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे आणि तंबाखूमुक्त समाज निर्माण करण्यासाठी नागरिकांना प्रेरित करणे हा आहे.

तंबाखूमध्ये निकोटीनसह अनेक घातक रसायने असतात. बीडी, सिगारेट, गुटखा, पानमसाला, हुक्का अशा विविध स्वरूपांत तंबाखूचे सेवन केले जाते. या व्यसनामुळे फुफ्फुसांचा, तोंडाचा व घशाचा कर्करोग, हृदयविकार, उच्च रक्तदाब, श्वसनविकार यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. तसेच गर्भवती महिलांच्या आरोग्यावर आणि गर्भाच्या विकासावरही त्याचा विपरीत परिणाम होतो. तंबाखूचे व्यसन केवळ आरोग्यालाच नव्हे तर कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनालाही हानी पोहोचवते. आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक तरुण विविध कारणांनी तंबाखूच्या आहारी जात आहेत. त्यामुळे तंबाखूविरोधी जनजागृती अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. या निमित्ताने तंबाखूमुक्त शाळा, तंबाखूमुक्त कार्यालय, सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन न करणे यांसारखे संकल्प प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. तंबाखूमुक्त जीवनाचे अनेक फायदे आहेत. तंबाखूचा त्याग केल्याने शरीर निरोगी राहते, श्वसनक्रिया सुधारते, हृदयविकाराचा धोका कमी होतो, आर्थिक बचत होते तसेच जीवनमान आणि आयुर्मान वाढण्यास मदत होते. व्यक्तीचे आरोग्य सुधारल्यास त्याचा





सकारात्मक परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावरही होतो.

भारत सरकारने लागू केलेला 'सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरातींवर बंदी व व्यापार, उत्पादन, पुरवठा आणि वितरणाचे नियमन) अधिनियम, २००३' (COTPA-2003) हा तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती, विक्री, वितरण आणि वापरावर नियंत्रण ठेवणारा महत्त्वपूर्ण कायदा आहे. या कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी, १८ वर्षांखालील व्यक्तींना तंबाखू उत्पादने विक्रीस बंदी, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्रीस मनाई तसेच तंबाखू उत्पादनांच्या पॅकेटवर आरोग्यविषयक चेतावणी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तंबाखूमुक्त समाज घडविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे. तंबाखू हे केवळ वैयक्तिक आरोग्यासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी घातक आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वतः तंबाखूपासून दूर राहून इतरांनाही त्यापासून दूर राहण्यासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. जागतिक तंबाखू विरोधी दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून निरोगी, सुरक्षित आणि तंबाखूमुक्त जीवन जगण्याचा दृढ संकल्प करण्याची संधी आहे. 'तंबाखूला नकार, निरोगी जीवनाला स्वीकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत, प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच काळाची गरज आहे.

**बाळासाहेब घुग**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला

## विद्यार्थ्यांनी टक्केवारीचा विचार न करता आत्मविश्वासाने यश गाठावे - अविनाश ठाकरे

प्रतिनिधी ३१ मे

### अकोट माळी महासंघातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न



**अकोट :** अकोट येथे दर वर्षी प्रमाणे याही वर्षी दहावा वर्ग व बारावा वर्ग या दोन्हीही वर्गाच्या प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन माळी महासंघाच्या वतीने मोठ्या उल्हासाने करण्यात आले होते.

गुणगौरव सत्कार सोहळ्यामध्ये उपस्थित सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना विद्यार्थ्यांनी आपल्या गरीब कठीण परिस्थितीत मधून जीवनातील आपल्या कॅरिअरचे टक्केवारीचा विचार न बाळगता आत्मविश्वासाने आपले टार्गेट यश गाठावे जेणेकरून आपले जीवनाचे शिक्षणाचे सार्थक होऊन आपला पाया पूर्ण होईल असे मार्गदर्शन संबोधित केले.

अकोट शहरामध्ये राम नारायण मंगल कार्यालयामध्ये बुधवार २७ ला सायंकाळी पार पडला असता या गुण गौरव सत्कार सोहळ्याचे सत्कारमूर्ती अविनाश ठाकरे राष्ट्रीय अध्यक्ष माळी महासंघ, हे लाभले होते तर प्रमुख पाहुणे रवींद्र अंबळकार राष्ट्रीय सचिव, राजेश जावरकर विभागीय अध्यक्ष, दिपक खलोकार जिल्हाध्यक्ष मा.महासंघ, प्रथमेश बोरोडे उपनगराध्यक्ष, अचल बेलसरे नगरसेवक, सचिन जुनगरे, नगरसेवक, राधेश्याम बहादुरे वैद्य. आ.वि.अध्यक्ष, सचिन भुस्कट, मिलिंद झाडे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश गणगणे महासचिव महाराष्ट्र प्र. काँ. कमिटी, स्वप्निल सोनार महात्मा फुले बँक मॅनेजर अकोट, यांची उपस्थिती लागली, यावेळी सर्वप्रथम क्रांतीसुर्य संत सावता महाराज. महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीसुर्य सावित्रीआई फुले यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन फुलपुष्पहार व दीप प्रज्वलन सर्व पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सत्कारमूर्ती अविनाश ठाकरे राष्ट्रीय अध्यक्ष, दीपक खलोकार, रवींद्र पोटदुखे, नंदकिशोर शेगोकार, व आशना किशोर बनसोड, पूर्वा केशव लांडे, समर्थ गोवर्धन गनोरकार, रिद्धी दीपक पोटदुखे व बारावी चे विद्यार्थी गायत्री प्रवीण लांडे, ऋतुजा वासुदेव काळे, वेदांत गंगाधर गावंडे , सार्थक गोपाल अंबळकार सह एकूण ४२ गुणवंत विद्यार्थ्यांचा आई-वडिलांच्या उपस्थितीमध्ये फुलपुष्प शाल श्रीफळ व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महेश गणगणे व रवींद्र अंबळकार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना यथोचित जीवनाची कसोटी शिक्षणाच्या माध्यमातून कशी प्रगती करावी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला जगन बगाडे, सचिन बेलोकार, अजय अडोकार,नितीन शेगोकार, हर्षल खाजबागे, केशव लांडे,अतुल लोखंडे, रवींद्र पोटदुखे, कमलेश यावले, रोहित नाथे ( इंजिनियर) संपूर्ण कार्यक्रमाला विशेष योगदान लाभले व विशेष मार्गदर्शक निलेश हाडोळे,नंदकिशोर शेगोकार, केशव बिलबिले , मनोज झाडे, शंतनु लोखंडे (इंजिनीयर) सचिन बेलोकार ( इंजिनीयर), विजय नवले,प्रणित खलोकार, ऋषिकेश सुपासे, सचिन काळे, सचिन सुपासे, मयूर लहाने, सुरज नाथे, अमोल निमकर, अरविंद फुसे, जुगल चिंचोलकर तर प्रास्ताविक प्रकाश गायकी, संचालन नितीन शेगोकार सर, आभार कमलेश येवले सर, संपूर्ण कार्यक्रमाला कार्यक्रम यशस्वी होण्याकरता अथक परिश्रम घेतले, यावेळी तालुक्यातील माळी महासंघ आकोट , तालुका कार्यकारणी, युवा आघाडी, जिल्हा कार्यकारणी, माळी महासंघाचे सर्व पदाधिकारी यांची उपस्थिती लावून सर्व माळी समाज बांधव महिला व पुरुष यांनी उपस्थिती लावली.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ३१ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# निवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ भाजपाचा सेल सदैव तत्पर : आ. सावरकर

प्रतिनिधी ३१ मे

**अकोला :** सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या असतात. त्यात काही समस्या कार्यालयीन पातळीवरच्या तर काही समस्या सामाजिक स्वरूपाच्या असतात. या संपूर्ण समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्व संवर्गातील व विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 'भाजपा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सेल' तयार करण्यात आला असून हा सेल सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे हित जोपासण्यासह त्यांच्या समस्या निवारणार्थ सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही विधान परिषदेचे मुख्य प्रतोद आ. रणधीर सावरकर यांनी दिली.

ते भाजपा सेलचे उद्घाटन स्थानिक जिल्हा परिषद कर्मचारी भवनात झाल्या त्या प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. अनुप धोत्रे तर प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे शहर अध्यक्ष जयंतराव मसने, छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, भाजपा नेते राजेश लुंगे या सेलचे प्रवर्तक सुनील जानोरकर, प्रदीप खाडे, राजेंद्र नेरकर, अशोक मांगुळकर व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते. सेवानिवृत्त अभियंता विनायकराव पांडे यांनी याप्रसंगी शंख वादन केले. खा. अनुप धोत्रे म्हणाले की, गाव पातळीपासून तर देश पातळीपर्यंतच्या अनेक समस्या सोडविण्यासाठी भाजपा यशस्वी झालेला आहे. याच विश्वासास अधीन राहून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या हितासाठी तयार करण्यात आलेला हा सेल निश्चितच चांगले काम करून सेवानिवृत्तांच्या समस्या मार्गी लावेल, असा मला ठाम विश्वास आहे. जयंतराव मसने यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रवर्तक सुनील जानोरकर यांनी प्रास्ताविक करून सेल निर्मितीचा हेतू विशद केला. संचालन प्रदीप खाडे तर राजेंद्र नेरकर यांनी आभार मानले.

## भाजपा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सेलचे थाटात उद्घाटन




### कार्यकारिणी केली जाहीर

सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भाजपा सेलची जिल्हा कार्यकारिणी शहराध्यक्ष जयंतराव मसने यांनी घोषित केली. त्यास आ. रणधीर सावरकर व खा. अनुप धोत्रे यांनी मंजुरी दिली. यात जिल्हा संयोजक सुनील जानोरकर, जिल्हा सहसंयोजक प्रदीप खाडे, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र नेरकर तर कोषाध्यक्षपदी अशोक मांगुळकर यांची नियुक्ती करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी लवकरच घोषित करण्यात येणार असल्याची माहिती या प्रसंगी देण्यात आली.

## हिवरखेडमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचे आगमन



**हिवरखेड :** उन्हामुळे जीवाची लाहीलाही होत असतानाच मे महिल्याच्या शेवटी हिवरखेडच्या वातावरणात थोडा बदल झाल्याचे दिसून येत आहे. अचानक ढगाळ वातावरण तयार होऊन वादळी वाऱ्यासह पावसाचे आगमन झाल्याने शहरवासीयांना कडक्याच्या उन्हापासून दिलासा मिळाला आहे.

तसेच शेतकऱ्यांना खरिपाच्या तयारीला लागण्याचे संकेतही दिले आहेत. त्यामुळे बळीराजा मरगळ झटकून आता कामाला लागल्याचे चित्र हिवरखडे परिसरात दिसून आले.




## जुने शहर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती समारोह संपन्न



प्रतिनिधी ३१ मे

**अकोला :** स्थानिक बाभळेश्वर चौक, रेणुका माता मंदिराजवळ, जुने शहर, अकोला येथे विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून करण्यात आली. यानंतर अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन निखीलेश दिवेकर यांनी केले असून 'स्वर्गीय इंदिरा गांधी या पंतप्रधान असताना त्यांनी सावरकरांचे डाक तिकीट प्रसिद्ध केले व त्यांच्या मुंबई येथील स्मारकासाठी स्वतः जवळचे ११ हजार रुपये देणगी दिली' असे मनोगत दिवेकर यांनी व्यक्त केले.

या जयंती सोहळ्यात प्रामुख्याने पांडुरंग वझे, सुधीर देशपांडे, नगरसेवक निलेश देव, उदय महा, अजय चव्हाण, दिलीप देशपांडे, पत्रकार श्रीकांत जोगळेकर, नितीन देशमुख, सुयोग रानडे, जयंत मराठे, मुकुंद कुलकर्णी, महादेव मेहेंगे, उदय थत्ते, महेश मोडक, नाना कुलकर्णी इत्यादी उपस्थित होते. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी या जयंती सोहळ्याला हजर राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाची सांगता सावरकर यांनी अंदमान येथील तुरुंगात लिहिलेल्या देशभक्तीपर गीत 'जयोस्तुते' हे गाणे गाऊन आनंद जहागीरदार, अनिरुद्ध खरे सर, व सतीश खोडवे सर यांनी केले.

## चान्नी पोलिसांची अवैध गावठी हातभट्टी दारू अड्डयावर धाड



प्रतिनिधी ३१ मे

**पातूर :** अकोला जिल्ह्यातील चान्नी पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारू व्यवसायावर मोठी कारवाई करत दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत मोठ्या प्रमाणात सडवा मोहाचा माल व दारू गाळण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३० मे २०२६ रोजी सकाळी गुप्त माहितीच्या आधारे चान्नी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रविंद्र लांडे यांच्या नेतृत्वाखाली नवगाव शेतशिवारात छापा टाकण्यात आला. यावेळी विजय महादेव पांडे (वय ३५ वर्षे) व जगदेव महादेव ससाणे (वय ५५ वर्षे), दोघेही रा. नवगाव हे गावठी हातभट्टीची दारू गाळत असल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ५८५ लिटर सडवा मोहाचा माल, ३० लिटर गावठी हातभट्टीची दारू तसेच

### आरोपींवर गुन्हा

दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण ८४ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षक अवचित चांडक यांच्या संकल्पनेतून, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पदघन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत प्रभारी अधिकारी रविंद्र लांडे, पोलीस उपनिरीक्षक महादेव देशमुख, पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल सोळंके व रूपेश मोरे यांनी सहभाग घेतला.

या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा बेकायदेशीर धंद्यांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ३१ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# टिपेश्वरमध्ये वाघीण-बिबट्याचा थरारक संघर्ष; बिबट्याचा मृत्यू

## 'डेझी' वाघिणीच्या शिकारीवर ताबा मिळवण्याच्या प्रयत्नात जीव गमावला

प्रतिनिधी ३१ मे



**यवतमाळ :** जिल्ह्यातील पांढरकवडा येथील टीपेश्वर अभयारण्यात वाघीण आणि बिबट्याच्या संघर्षात अंदाजे चार वर्षीय बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. शिकारीवरून झालेल्या या संघर्षामुळे जंगलातील अन्नसाखळीतील स्पर्धा आणि वन्यजीवांमधील वर्चस्वाच्या लढाईचे वास्तव समोर आले आहे.

वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, टी-४४ क्रमांकाची 'डेझी' नावाने ओळखली जाणारी वाघीण हिने हरणाची शिकार केली होती. या शिकारीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न एका बिबट्याने केला. त्यातून वाघीण आणि बिबट्या यांच्यात जोरदार संघर्ष झाला. संघर्षादरम्यान वाघिणीने बिबट्यावर हल्ला करून त्याला ठार केले.

संघर्षानंतर वाघिणीने बिबट्याचा मृतदेह तलावाजवळील डोंगराच्या उतारावरील बांबूच्या झुडपांमध्ये नेऊन ठेवला होता. नियमित गस्तीदरम्यान वनमजुरांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली.

माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दुर्गम भाग असल्याने घटनास्थळीच शवविच्छेदन व दहन करणे शक्य नव्हते. त्यामुळे मृतदेह सुरक्षितपणे बाहेर आणण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या शवविच्छेदनात बिबट्याच्या शरीरावर अनेक ठिकाणी नखांचे व दातांचे खोलवर घाव आढळून आले. आवश्यक नमुने व महत्त्वाचे अवयव जतन करून पुढील तपासणीसाठी ठेवण्यात आले. त्यानंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. रणजीत नाळे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. पायघन व डॉ. काळमेघ यांनी शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक उदय आव्हाड, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत सोनुले, मानद वन्यजीव रक्षक रमजान विराणी, निसर्ग मित्र मंचचे अध्यक्ष सुबोध काळपांडे यांच्यासह वनपाल शशांक सोनटक्के, चंद्रकांत हेमके, वनरक्षक दिगंबर पोटे, स्मिता बेलेकर आणि वनमजूर उपस्थित होते. या घटनेमुळे टीपेश्वर अभयारण्यात शिकारीच्या हक्कावरून वाघ आणि बिबट्यांमध्ये होणारे संघर्ष किती तीव्र असू शकतात, याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, अन्न आणि अधिवासावरील स्पर्धेमुळे अशा घटना जंगलात अधूनमधून घडत असतात.

# पत्नीच्या खुनाप्रकरणी पतीला सश्रम कारावास

## बीएनएसएस कायद्यांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील पहिली शिक्षा

प्रतिनिधी ३१ मे

**यवतमाळ :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या करणाऱ्या पतीला न्यायालयाने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अंतर्गत संकलित करण्यात आलेले डिजिटल व फॉरेन्सिक पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरत यवतमाळ जिल्ह्यातील पहिली शिक्षा ठोठावली आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ११ महिन्यांत आणि दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर नऊ महिन्यांत प्रकरणाचा निकाल लागल्याने या खटल्याची जिल्ह्यात चर्चा होत आहे.

दलुराम गुलाब राठोड (वय ५९) रा. यावली असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. वडगाव (जंगम) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील यावली येथे ३ जून २०२५ रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास ही घटना घडली होती. बेबीबाई दलुराम राठोड (वय ५६) या झोपेत असताना त्यांचे पती दलुराम गुलाब राठोड (वय ५९) यांनी चारित्र्यावर संशय घेत तलवारीसदृश लोखंडी शस्त्राने छातीत वार करून त्यांची हत्या केली होती.

घटनेची माहिती मिळताच वडगाव (जं.) पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. मृत महिलेच्या मुलाच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांनीही घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, साक्षीदारांचे जबाब, शस्त्र पडताळणी, जखमांचे रेखाचित्र तसेच न्यायवैद्यक आणि फॉरेन्सिक पुरावे संकलित केले. आरोपी पत्नीच्या चारित्र्यावर सातत्याने संशय घेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. यापूर्वीच्या तक्रारींची कागदपत्रेही तपासात जोडण्यात आली.

बीएनएसएस २०२३ कायद्यांतर्गत ई-साक्ष प्रणालीचा वापर करून पंचनामे, व्हिडीओग्राफी, साक्षीदारांचे जबाब आणि डिजिटल पुरावे संकलित करण्यात आले. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे नोंदविले. या सर्व बाबींचा आधार घेत २६ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकारी अभियोक्ता ॲड. शुभांगी दरणे, तपासी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास दांडे आणि कोर्ट पैरवी अधिकारी रवि चव्हाण यांनी साक्षीदार व पंचांची प्रभावी मांडणी केली. तसेच फॉरेन्सिक अहवाल आणि जप्त मुद्देमाल वेळेत न्यायालयात सादर करण्यात आला.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शेखर मुनगटे यांनी सर्व पुरावे ग्राह्य धरून आरोपी दलुराम राठोड याला दोषी ठरविले. बीएनएसएस २०२३ अंतर्गत संकलित पुराव्यांच्या आधारे यवतमाळ जिल्ह्यातील ही पहिली शिक्षा ठरली आहे.

या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास दांडे यांनी केला. तपासात पोलिस कर्मचारी अनिल गिनगुळे यांनीही सहकार्य केले.

# श्याम तोड़कर यांचे निधन

प्रतिनिधी ३१ मे



**यवतमाळ :** श्याम नानाजी तोड़कर (रा. यवतमाळ) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक 19 में रोजी दुःखद निधन झाले. ते ५६ वर्षाचे होते.

शाम तोडकर हे उपमुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (प्रकल्प) कोंकण रेल्वे म्हणून नवी मुंबई येथे कार्यरत होते. त्यांच्या श्रध्दांजलीचा कार्यक्रम दिनांक 31 मे 2026 रोजी हॉटेल वेनेशीयन, जाम रोड, यवतमाळ येथे सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

नागरिक, नातेवाईक, हितचिंतकांनी श्रद्धांजली कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.लीना शाम तोडकर, लव शाम तोडकर, स्वानंद शाम तोडकर, राम नानाजी तोडकर यांनी केले आहे. श्याम तोडकर हे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मधील सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता सुरेश मडावी यांचे साळे होते.

# दारव्हा शहरात पेट्रोल-डिझेल टंचाई; शेतकरी व वाहनधारक त्रस्त

प्रतिनिधी ३१ मे

**दारव्हा :** शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिक, वाहनधारक आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत. इंधनासाठी पंपांवर चकरा मारूनही अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर नांगरणी, वखरणी व इतर मशागतीची कामे सुरू असताना डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ट्रॅक्टर व कृषी यंत्रांसाठी आवश्यक इंधन उपलब्ध नसल्याने शेतीची कामे खोळंबण्याची शक्यता आहे. इराण-इस्त्रायल संघर्षामुळे जागतिक इंधन बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाल्याच्या चर्चा सुरू असल्या तरी स्थानिक पुरवठा खंडित होण्याबाबत प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी होत आहे.

# सतीश तायडे यांचा सभापतीपदाचा राजीनामा

प्रतिनिधी ३१ मे



**दिग्रस :** दिग्रस कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती सतीश तायडे यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा दिल्याने सहकार आणि राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. गेल्या दीड दशकाहून अधिक काळ बाजार समितीच्या सत्ताकारणात प्रभावी भूमिका बजावणारे आणि तब्बल पाच वेळा सभापतीपद भूषविणारे तायडे यांच्या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बाजार समितीच्या इतिहासात सातत्यपूर्ण आणि प्रभावी नेतृत्व करणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये सतीश तायडे यांचा उल्लेख केला जातो. शेतकरी, व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी त्यांनी मजबूत संपर्क राखत समितीमध्ये व्यापक संघटन उभे केले. त्यांच्या कार्यकाळात बाजार समितीच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ, विविध विकासकामांची अंमलबजावणी आणि आर्थिक व्यवहारांमध्ये स्थैर्य निर्माण झाल्याचे मानले जाते.

या राजीनाम्याला राजकीयदृष्ट्याही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तायडे हे आमदार संजय देशमुख यांचे निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी मानले जातात. देशमुख यांच्या राजकीय रणनीतीमध्ये तायडे यांची भूमिका महत्त्वाची राहिल्याने या निर्णयामागील कारणांबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त होत आहेत.

राजीनाम्यामागे वैयक्तिक कारणे, आरोग्यविषयक अडचणी की आगामी राजकीय घडामोडी, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, त्यांच्या अचानक झालेल्या निर्गमनामुळे बाजार समितीतील पुढील नेतृत्व कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दिग्रस कृषी उत्पन्न बाजार समितीतील या घडामोडीमुळे आगामी काळात सत्तासमीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, नव्या नेतृत्वाच्या निवडीबाबत उत्सुकता वाढली आहे. राजकीय आणि सहकारी क्षेत्रातील जाणकारांच्या मते, तायडे यांच्या राजीनाम्याचे पडसाद आगामी स्थानिक राजकारणातही उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पीक विम्यासाठी १ जूनला 'जवाब दो' आंदोलन

## शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - नियोजन बैठकीत आवाहन

प्रतिनिधी ३१ मे



**उमरखेड :** खरीप हंगाम २०२५ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती नुकसानीच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित पीक विमा तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या मागणीसाठी १ जून रोजी आयोजित 'जवाब दो' आंदोलनाच्या अनुषंगाने आज उमरखेड येथे शेतकऱ्यांची नियोजन बैठक पार पडली.

बैठकीत आंदोलनाच्या स्वरूपाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच विविध मागण्यांवर एकमताने भूमिका निश्चित करण्यात आली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रलंबित पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली.

खरीप हंगाम २०२५ मध्ये उमरखेड तालुक्यासह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात अभूतपूर्व अतिवृष्टी झाली होती.

या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. त्यातच खत, बियाणे, कीटकनाशके आणि इतर शेती उपयोगी साहित्यांच्या वाढलेल्या किमती, कर्जमाफीतील विलंब तसेच कर्ज पुनर्गठनाची प्रक्रिया रखडल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

अशा परिस्थितीत पीक विमा हा शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरू शकतो. त्यामुळे शासन व प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत प्रलंबित विमा रक्कम तात्काळ वितरित करावी, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

तसेच सोमवार, दि. १ जून रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, उमरखेड येथे आयोजित 'जवाब दो' आंदोलनात तालुक्यातील सर्व शेतकरी, शेतकरी संघटना आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. या बैठकीस तालुक्यातील अनेक युवा शेतकरी, शेतकरी प्रतिनिधी आणि विविध गावांतील शेतकरी उपस्थित होते.

# दर्डा नाका परिसरातील वाढत्या चोरींवर कारवाईची मागणी; सीसीटीव्ही यंत्रणा ठरत आहे का निष्प्रभ?

प्रतिनिधी ३१ मे



**यवतमाळ :** शहरातील दर्डा नाका परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुचाकी चोरी, मोबाईल चोरी तसेच महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने परिसरातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

या घटनांबाबत तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यात जाणाऱ्या नागरिकांना समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पूसनाके यांनी केला आहे. चोरीच्या घटनांनंतर तत्काळ कारवाई करण्याऐवजी विविध कारणे सांगून तक्रारदारांची बोळवण केली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यवतमाळ नगरपालिकेने शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी लाखो रुपयांचा खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. या यंत्रणेचा उपयोग गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी आणि गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अपेक्षित असताना चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सीसीटीव्ही यंत्रणा प्रत्यक्षात किती प्रभावी आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. "जर नागरिकांच्या सुरक्षेसाठी उभारलेली सीसीटीव्ही यंत्रणा गुन्हे उघडकीस आणण्यात आणि गुन्हेगारांना पकडण्यात प्रभावी ठरत नसेल, तर ती केवळ शोपीस ठरत आहे का?" असा सवाल कृष्णा पूसनाके यांनी केला आहे.

दर्डा नाका परिसरातील वाढत्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेऊन पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, सीसीटीव्ही फुटेजची प्रभावी तपासणी करावी आणि नागरिकांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# रेल्वे प्रकल्पातील कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

प्रतिनिधी ३१ मे



**उमरखेड :** तालुक्यातील तरोडा फाटा येथे रेल विकास निगम लिमिटेड (RVNL) अंतर्गत सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पावर कार्यरत कामगारांसाठी शनिवारी भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राथमिक आरोग्य केंद्र मुळावा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल दवणे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

कामगारांच्या आरोग्य संवर्धनाच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात असंसर्गजन्य आजार (NCD) तपासणीअंतर्गत रक्तदाब, रक्तातील साखरेची पातळी तसेच ईसीजी तपासणी करण्यात आली. याशिवाय क्षयरोग व कुष्ठरोग तपासणीही करण्यात आली. संशयित रुग्णांच्या छातीचे एक्स-रे काढून पुढील उपचारांसाठी आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय उमरखेडच्या आयसीटीसी विभागामार्फत एचआयव्ही/एड्स तपासणी व समुपदेशन कार्यक्रमही राबविण्यात आला. यावेळी कामगारांना संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात आली तसेच आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यात आले. शिबिरास जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सागर जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील दुबे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल दवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मुळावा येथील आरोग्य सहायक विनोद घुगे, शिवाजी शिरामे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील वानखेडे, डॉ. निलम लेकुळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सुरेश राठोड, आरोग्य सेवक ज्ञानदीप वानोळे, सूरज पराते, प्रल्हाद सोनटक्के, रविंद्र शिंदे, फ्लेबोटोमिस्ट आशा पवार तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या आयसीटीसी समुपदेशक वैशाली धोंगडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे रेल्वे प्रकल्पातील कामगारांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत झाली असून विविध आजारांचे लवकर निदान आणि उपचारासाठी हे शिबिर उपयुक्त ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्ती अभियानानिमित्त भाजपाची जिल्हास्तरीय कार्यशाळा

प्रतिनिधी ३१ मे



**यवतमाळ :** केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षपूर्ती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "विकास, विश्वास व जनकल्याण" अभियानाच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन शिवाजीनगर येथील केमिस्ट भवनात करण्यात आले. कार्यशाळा जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन माजी मंत्री मदनभाऊ येरावार यांच्या हस्ते झाले. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोकराव उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज भैय्या अहिर, आमदार राजूभाऊ तोडसाम, माजी आमदार अण्णासाहेब पारवेकर, जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार, कैलास बोंद्रे, रेखा कोटेकर, मोहन कणाके, शंतनू शेटे तसेच अभियान संयोजक प्रवीण कोकाटे आणि श्रीराम मेलकेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांनी अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान, प्लास्टिक निर्मूलन, ई-कचरा संकलन, वृक्षारोपण व वृक्ष संगोपन यांसह आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिरे, जनसंवाद व जनकल्याण शिबिरे, निबंध आणि चित्रकला स्पर्धा तसेच केंद्र सरकारच्या योजनांवरील प्रदर्शने आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून अभियानाचे स्वरूप, विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी, लाभार्थी संपर्क मोहीम आणि संघटनात्मक नियोजन याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

उद्घाटनपर भाषणात मदनभाऊ येरावार यांनी केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. तर समारोपप्रसंगी हंसराज भैय्या अहिर यांनी बुद्धिजीवी, सामाजिक आणि विविध घटकांशी संवाद साधणारे कार्यक्रम आयोजित करून मोदी सरकारची विकासगाथा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीराम मेलकेवार यांनी केले. आभार प्रदर्शन जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यशाळेस जिल्ह्यातील मंडल अध्यक्ष, महामंत्री, मोर्चा पदाधिकारी, अभियान संयोजक व सहसंयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण; भारतीय जैन संघटनेचा पुढाकार

प्रतिनिधी ३१ मे



**यवतमाळ :** राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी भारतीय जैन संघटना (BJS) ने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुणे जिल्ह्यातील वाघोली येथील शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात प्रवेश देऊन बारावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल (भाऊ) मुथ्था यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या योजनेत विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, कपडे, शैक्षणिक साहित्य आणि इतर आवश्यक सुविधांची जबाबदारी संघटनेने स्वीकारली आहे.

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विदर्भ अध्यक्ष संदीप मुनोत, विदर्भ सचिव डॉ. शेखर बंड यांच्यासह महेंद्र बोरा, दिलीप रेदासनी, कीर्ती मुथा, वंदना बोरंदिया, सुशील कटारिया, विनय मुनोत, रुपेश भंडारी, डॉ. सारिका शहा, विजय चुंबळे आणि श्रद्धा सोईतकर हे पदाधिकारी कार्यरत आहेत.

संघटनेच्या सूचनेनुसार विकास बहुले आणि विकास लोणकर यांनी यवतमाळ येथे भेट देऊन प्रवेश प्रक्रियेला गती दिली. जिल्हा समन्वयक डॉ. शेखर बंड, मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक मनीष बनसोड तसेच अन्य पदाधिकाऱ्यांकडून विद्यार्थी व पालकांना योजनेची माहिती देऊन अर्ज भरण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील पात्र विद्यार्थ्यांनी २ जूनपूर्वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन संघटनेने केले आहे. आर्थिक व सामाजिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम आशादायी ठरत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे.

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. ३१ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## परदेशात उच्च शिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

**अमरावती :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे, अशी माहिती धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

# राज्यात प्रथमच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शंभर टक्के पारदर्शक बदल्या

प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती:** जिल्हा प्रशासनात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्या यावर्षी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या असून यावर्षी जिल्हा प्रशासनाने राज्यात प्रथमच समुपदेशाने बदलीचे धोरण काटेकोरपणे अंमलबजावणी करीत केले आहे. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी स्वतः बदलीसाठी पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधला.

शंभर टक्के बदल्या समुपदेशाने करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाची भावना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या बचतीच्या आव्हानाला प्रतिसाद देत समुपदेशनाने बदलीचा प्रयोग जिल्ह्यात यशस्वी ठरलेला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या आस्थापनेवरील प्रशासकीय बदलीस पात्र




सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक व वाहनचालक या संवर्गांच्या प्रशासकीय बदल्या-२०२६ दि. २९ मे २०२६ रोजी समुपदेशनाद्वारे पार पडलेल्या आहेत.

दरवर्षी समुपदेशनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचारी उपस्थित राहून समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रियेत सहभागी होतात. परंतु यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना केलेल्या आवाहनानुसार घरून काम करण्याची मुभा, अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करून सार्वजनिक

### ♦ जिल्हाधिकाऱ्यांची अभिनव संकल्पना

वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करून नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढविणे व परदेश दौरे टाळणे इ. बाबींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत.

त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने सूचित केलेल्या उपाययोजनांचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या अधिनस्त जिल्ह्यातील सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसुल सहायक, ग्राम महसुल अधिकारी, वाहन चालक इत्यादी संवर्गातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांना पेट्रोल, डिझेलचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच प्रवास टाळण्यासाठी त्यांच्या कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयात न बोलविता दि. २९ मे रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे समुपदेशन बदली प्रक्रिया आयोजित करण्यात आली. यामध्ये सहायक महसूल अधिकारी संवर्गात बदलीस पात्र ४१ कर्मचाऱ्यांपैकी ४१ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली, मंडळ अधिकारी संवर्गात ५ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्यांची बदली झाली, ग्राम महसूल अधिकारी संवर्गात ८२ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ८२ कर्मचाऱ्यांची बदली झाली, महसूल सहायक संवर्गात ३९ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ३९ कर्मचाऱ्यांची बदली झाली आणि वाहन चालक संवर्गात ३ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आलेली आहे.

या बदली प्रक्रियेत सर्व संबंधित कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यालयातूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतलेला आहे. वरीलप्रमाणे पार पडलेल्या बदली प्रक्रियेबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. धारणी, वरूड, अंजनगांव सुर्जी, धामणगांव रेल्वे इत्यादी दूरच्या कार्यालयातून बदली प्रक्रियेसाठी अमरावती मुख्यालयात न येता त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रक्रियेत सहभागी होता आल्यामुळे अत्यंत पारदर्शक व विक्रमी वेळेत बदली प्रक्रिया पार पडल्यामुळे कर्मचारी संघटनांनी आनंद व्यक्त केलेला आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी अभिनव संकल्पना राबविल्यामुळे त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. या बदली प्रक्रियेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय न झाल्यामुळे सदर बदली प्रक्रिया यापुढेही अशाचप्रकारे राबवावी, असे कर्मचाऱ्यांनी मत व्यक्त केले आहे. आशियाई संकटाच्या आव्हानात्मक परिस्थितीत जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी प्रशासकीय बदल्या सुयोग्य, पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने पार पाडल्या आहेत आणि हा उपक्रम निश्चितच प्रशंसनीय आहे.

## सुधाकर भारसाकळे यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपस्थितीत घेतला प्रवेश

प्रतिनिधी ३१ मे

**दर्यापूर :** सहकार नेते सुधाकर पाटील भारसाकडे यांनी काँग्रेसला सोडचिट्ठी दिल्यानंतर मुंबई येथे एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेना शिंदे गटात आपल्या एकतीस पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत शिवसेना पक्षात प्रवेश घेतला.

आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात हा प्रवेश घेण्यात आला आहे. त्यावेळी मंत्री संजय राठोड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अमरावती जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा सहकार क्षेत्रातील



ज्येष्ठ नेते सुधाकर पाटील भारसाखळे यांनी मेळावा घेऊन काँग्रेसला राम राम केला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेना शिंदे गटात जाण्याचा जाहीरही केले होते. दर्यापूर तालुक्याला हा काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे. प्रवेश घेताना, दर्यापूर बाजार समिती, खरेदी विक्री संघ, व काही नगरसेवकांचाही समावेश आहे.

## महानगरपालिकेत अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती:** अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते अहिल्यादेवी होळकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी सभागृह नेता चेतन गावंडे, झोन सभापती इस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक सचिन वैद्य, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## नोकरीच्या आमिषाने विद्यार्थ्यांकडून १० हजारांची मागणी

### 'ग्रेट शेरलॉक' कंपनीवर कारवाईची मागणी; विद्यापीठाने झटकले हात

प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी मनुष्यबळ पुरवण्याचे कंत्राट असलेल्या 'ग्रेट शेरलॉक प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीविरोधात विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. कंपनीने अमरावतीतील एका हॉटेलमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना मुलाखतीसाठी बोलावले होते. मात्र नोकरी देण्याच्या बदल्यात प्रत्येक उमेदवाराकडून १० हजार



रुपये मागितले जात असल्याची माहिती युवक काँग्रेसला मिळाल्यानंतर पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धडक देत कथित गैरप्रकार उघडकीस आणला.

यावेळी युवक काँग्रेस आणि कंपनीच्या प्रतिनिधींमध्ये जोरदार शाब्दिक वाद झाला. युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख यांनी गोरगरीब विद्यार्थ्यांची लूट सहन केली जाणार नसून संबंधित कंपनीवर तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाने कंपनीला केवळ मनुष्यबळ पुरवण्याचे कंत्राट दिले असून उमेदवारांकडून पैसे उकळण्याशी विद्यापीठाचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी अशा मागण्यांना बळी पडू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

## मतदार याद्यांची एसआयआर मॅपिंग प्रक्रियेत नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवावा

### ♦ आ. सुलभा खोडके यांचे आवाहन

प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती:** भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) अंतर्गत अमरावती मध्ये वर्ष २००२ च्या मतदार यादी सोबत सद्याची वर्ष २०२४ च्या मतदार यादीची पडताळणी करून मॅपिंग करण्यात येत आहे. या मोहिमेत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी ( बीएलओ ) मार्फत घरोघरी जाऊन अथवा ऑनलाईन पद्धतीने मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात जास्तीत जास्त एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी संबंधित बीएलओंना



भेटून स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवावा. असे आवाहन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

सद्यास्थितीत झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे. (३८)-अमरावती विधानसभा मतदार संघात मतदारांचे जास्तीत जास्त मॅपिंग करण्याकरिता ३२२ बीएलओ कार्यरत असून त्यांच्या कडून सदरचे काम पूर्ण करून घेण्यासाठी ३१ बीएलओ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. अमरावती मध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणीचे काम जवळपास ७१ टक्के झाले. अद्यापही २४ टक्के मतदारांचे मॅपिंग होणे बाकी आहे.

त्यामुळे ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी तातडीने आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ ) यांच्याशी संपर्क साधावा. ज्या मतदारांचे बीएलओंकडून मॅपिंग पूर्ण झाले आहे, त्यांची 'एसआयआर' प्रक्रिया अत्यंत सोप्या आणि सुरळीत पद्धतीने पार पडणार आहे. तसेच मतदाराचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल तर त्याचे आई-वडील, आजी-आजोबा यांचे नाव 'ॲप' अँप द्वारे शोधून यांचे २००२ मधील मतदार संघ क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक व अनुक्रमांक असा हा तपशील तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे.

**मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर**

भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' घेण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर झाला आहे. ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होईल. या मोहिमेत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत 'बीएलओ' घरोघरी जाऊन आधीच माहिती भरलेले 'गणना प्रपत्र' मतदारांना देतील. यात मतदाराची सध्याची माहिती तसेच २००२-२००४ मधील जुनी माहिती भरलेली असेल किंवा ती मतदाराला स्वतः भरता येईल. मतदारांना ही जुनी माहिती निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या संकेतस्थळावरूनही मिळवता येईल.

## आई रमाई सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षातील एक मूक शक्ती: एम.डी. सरोदे

### ♦ दहा दिवसीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचा समारोप, धम्म मेळावा उत्साहात

प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती:** त्यागमूर्ती माता रमाईंचे जीवन हे केवळ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची पत्नीच म्हणून नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाच्या महान संघर्षामागील एक मूक शक्ती म्हणून होते. रमाईंच्या जीवनात सुखापेक्षा दुःख अधिक होते. अनेक संकटे, मुलांचे निधन, आर्थिक अडचणी आणि एकाकीपणा सहन करूनही त्यांनी कधीही तक्रार केली नाही. बाबासाहेबांच्या ध्येयावर त्यांचा अढळ विश्वास होता. म्हणूनच त्यांना त्यागमूर्ती माता रमाई असे संबोधले जाते असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय प्रशिक्षण विभागाचे उपप्रमुख तथा स्टार प्रचारक कवी, लेखक एम.डी. सरोदे यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा बडनेरा व तालुका शाखा नांदगाव खंडेश्वर च्या संयुक्त विद्यमाने तथागत गौतम बुद्ध यांची




जयंती व त्यागमूर्ती आई रमाई यांच्या स्मृतिदिनाच्या पर्वावर दहा दिवसीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचा समारोप तथा भव्य धम्म मेळावा बुधवार (ता. २७) रोजी कपिल मंडळ बुद्ध विहार, अशोक नगर येथे पार पडला प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भन्ते शक्यपुत्र राहुल, केंद्रीय प्रशिक्षण विभाग उपप्रमुख तथा स्टार प्रवक्ते एम डी सरोदे, राज्य संघटक विजयकुमार चोरपगार होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रा.प्रकाश बोरकर, भदंत नागसेन भदंत सारीपुत्त, भदंत महामोगलायन, भदंत आनंद यांच्यासह ४१ श्रामणेर, प्रमुख अतिथी म्हणून महिला शाखा जिल्हाध्यक्ष संगीता सरदार, अमरावती महानगर महिला अध्यक्ष प्रमिला शेंडे, गणपत तिडके, जिल्हा संघटक मुरलीधर रायबोर्ड, माजी सभापती प्रकाश बनसोड, केंद्रीय शिक्षक विलास आठवले धम्मपिठावर विराजमान होते.

एम.डी. सरोदे आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि मानवमुक्तीसाठी जो ऐतिहासिक संघर्ष केला, त्या संघर्षात रमाईंचे योगदान अतुलनीय होते. अत्यंत गरीबी, हालअपेष्टा, उपासमार आणि कौटुंबिक संकटांचा सामना करत त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि समाजकार्य करण्यासाठी खंबीर आधार दिला आहे. इतिहासात अनेक महान पुरुषांची नावे आढळतात परंतु त्यांच्या यशामागे उभ्या असलेल्या त्यागी स्त्रियांचा उल्लेख अनेकदा दुर्लक्षित राहतो. रमाई या अशाच एका महान स्त्री होत्या. त्यांनी स्वतःच्या सुखाचा विचार न करता समाजाच्या भवितव्यासाठी बाबासाहेबांच्या कार्याला पाठबळ दिले. त्यांचा त्याग नसता, तर बाबासाहेबांचे कार्य इतक्या व्यापक स्वरूपात घडले असते का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारावा, स्मृतिदिनी रमाईंच्या जीवनातून तीन महत्त्वाचे संदेश घ्यायला हवेत त्याग आणि समर्पण संयम आणि संघर्षशीलता समाजहितासाठी निःस्वार्थ सेवा रमाईंचे जीवन आपल्याला शिकवते की महान परिवर्तनासाठी केवळ नेतृत्वच नव्हे तर त्याग, धैर्य आणि समर्पणाचीही आवश्यकता असते.

# जागतिक शांतता आणि सामाजिक सलोख्यासाठी अमरावतीत उमटला 'सामुदायिक प्रार्थना' चा सूर !

### ♦ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंतीनिमित्त युगप्रभात फाउंडेशनचा उपक्रम ♦ खासदार, आमदारांसह सर्वपक्षीय नेते आणि हजारो अमरावतीकरांची पंचवटी चौकात उपस्थिती

प्रतिनिधी ३१ मे

**अमरावती:** जगात सध्या सुरू असलेल्या युद्धांचे सावट आणि त्याचे सर्वच देशांवर होणारे विपरित परिणाम, तसेच देशांतर्गत धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान समोर असतानाच, अमरावतीत आज एक अभूतपूर्व आणि सकारात्मक सोहळा अनुभवायला मिळाला. निमित्त होते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंतीचे. या पर्वाचे औचित्य साधून 'युगप्रभात फाउंडेशन' आणि 'सामुदायिक प्रार्थना आयोजन समिती, अमरावती' यांच्या वतीने स्थानिक पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्यापाशी एका भव्य 'विश्वशांतीकरीता सामुदायिक प्रार्थना' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आज सायंकाळी ६:३० वाजता पार पडलेल्या या सोहळ्यात हजारो अमरावतीकरांनी एकत्र येत विश्वशांतीसाठी प्रार्थना केली.



'धर्म-पंथ देशाचे भांडण।
न मिटे ऐक्य-प्रेमाविण।
ते प्रेम साधाया प्रार्थने समान।
पातळी नाही उमध ?

राष्ट्रसंतांच्या याच उदात्त विचारांचा धागा पकडून, समाजात बंधुभाव, ऐक्य आणि जागतिक शांतता निर्माण व्हावी या मुख्य उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सध्याच्या अस्थिर जागतिक वातावरणात आणि देशात धर्माधर्मामध्ये निर्माण होणारी तेढ दूर करण्यासाठी मानवी मूल्ये जपणे व सामूहिक प्रार्थनेच्या माध्यमातून मनामनात शांततेचा संदेश पोहोचवणे ही काळाची गरज बनली आहे, हाच सूर या संपूर्ण सोहळ्यातून उमटला.

**मान्यवरांची मांदियाळी आणि जनसागर**

या मंगलमय सोहळ्याला अमरावतीतील विविध क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तिमत्त्वांची आणि राजकीय नेत्यांची विशेष उपस्थिती लाभली होती. यामध्ये प्रामुख्याने आदरणीय पद्मश्री जनार्धन बोथे गुरुजी, आचार्य हरिभाऊजी वेरुळकर, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ, व्हि. गो ठाकरे, मनपा गटनेते चेतन गावंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**भक्तिमय आणि ऊर्जस्विनी वातावरण**

पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मारकाचा परिसर आज सामुदायिक प्रार्थनेने आणि जयघोषाने भक्तीमय झाला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संत गाडगे बाबा यांच्या विचारांमधून प्रेरणा घेत, उपस्थित सर्व मान्यवर आणि हजारो नागरिकांनी एका सुरात, एका लयीत विश्वशांतीसाठी सामूहिक प्रार्थना केली. डोळे मिटून, शांत चित्ताने केलेल्या या प्रार्थनेमुळे संपूर्ण परिसरात एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली होती.

जागतिक युद्धजन्य परिस्थितीचा फटका सर्वसामान्य माणसाला बसत असताना, भारतासह संपूर्ण जगात शांतता, सौहार्द आणि प्रेम नांदावे, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युगप्रभात फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी व आयोजन समितीने विशेष परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि ३१ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर, बोगस कॅरेक्टर...


सिटी न्यूज वाशीम
जन्मापूर्वीच घात, करतात गर्भपात...
उमलण्यापूर्वीच कुस्करतात कळी, डॉक्टर घेतात अनेक बळी!


सिटी न्यूज वाशीम
जन्मापूर्वीच घात, करतात गर्भपात...
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर!

# आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात!

## जन्मापूर्वीच घात, करतात गर्भपात...

● अतिष देशमुख @वाशीम ●

वाशीम जिल्ह्यातील मालेगाव नगरीत राजाश्रयाच्या भरवशावर सुरू असलेल्या गर्भपाताच्या आणि बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचण्या करून कोट्यवधीची कमाई करणाऱ्या अविवेकी डॉक्टरसह त्याच्या महापापात सहभागी असलेल्या अज्ञात महिला डॉक्टरला पोलिसांनी 'ज्ञात' करून गजाआड करावे. तसेच आरोग्य विभागाने अविवेकी डॉक्टरच्या सोनोग्राफीच्या गोरखधंद्याला कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जागरूक जनतेकडून केल्या जात आहे. या प्रकरणाच्या तपासाकडे मालेगावसह पंचक्रोशीतील जनतेचे लक्ष असून पुढील कारवाई काय होणार याची जनतेला उत्सुकता लागल्याची चर्चा आहे.






* राजाश्रयाच्या भरवशावर अनेक वर्षापासून मालेगावात गैरप्रकार
* अविवेकी डॉक्टरच्या गर्भपाताचा गोरखधंदा आरोग्यविभागाने कायमस्वरूपी बंद करावा
* जनतेची मागणी

## कारवाई न करण्याचा करार, आरोपी फरार

गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड अविवेकी डॉक्टरचा सोनोग्राफीचा व्यवसाय गर्भ लिंग निदान चाचणी करून स्त्री भृण हत्या करण्यासाठी नावारूपास आला आहे. अविवेकी डॉक्टरचे लागेबांधे वाशीम जिल्ह्यातील डॉक्टरांसह अनेक डॉक्टरच्या हाताखाली कंपाऊंडरचे काम करणाऱ्या आणि सद्या अविवेकी डॉक्टरच्या महापापात सहभागी होवून दलाली खाणाऱ्या बोगस डॉक्टरांसोबत असल्याची चर्चा आहे. मालेगाव नगरीच्या गजबजलेल्या




बाजारपेठेच्या मध्यभागी अविवेकी डॉक्टरचा दवाखाना आहे. या दवाखान्याची ख्याती 'गुड न्यूज' आणि 'बॅड न्यूज' च्या अफलातून बेकायदेशीर व्यवसायामुळे वाशीम जिल्ह्यातच नव्हेतर परिसरातील विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या काही राज्यापर्यंत अविवेकी डॉक्टरच्या लाभार्थीची व्याप्ती असल्याची मालेगाव परिसरात चर्चा आहे. शासनाची गर्भ लिंग निदान चाचणी करण्यासाठी 'बंदी' आहे. अशा चाचण्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटर वर कारवाई करण्याचे आरोग्य यंत्रणेला अधिकारही आहेत. परंतु मालेगावात खुलेआम गर्भ लिंग निदान चाचण्या करून स्त्री भृण हत्या करणार्या या अविवेकी डॉक्टरच्या विरोधात कारवाई केल्या जात नव्हती. एखाद्या अधिकाऱ्याने कारवाईचा प्रयत्न केला तर त्या अधिकाऱ्यावर दबावतंत्राचा, पैशाच्या आमिषाचा वापर करून या महापापाची शृंखला अविरत सुरू ठेवण्यासाठी अविवेकी डॉक्टरसह त्याला साथ देणारी सर्वांना माहिती असलेली महिला डॉक्टर, दलाल यांनी साथ देवून या महापापाच्या कमाईतून आर्थिक सुबत्ता प्राप्त केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड सुरू असलेल्या या गोरखधंद्यावर मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या धाडसी वैद्यकीय अधीक्षकांनी अविवेकी डॉक्टरच्या सौनोग्राफी सेंटरवर बनावट महिला पेशंट पाठवून अविवेकी डॉक्टरच्या पापाचा भांडाफोड केला आहे. या प्रकरणी आरोग्य विभागाच्या वतीने मालेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. परंतु या तक्रारीत पापात सक्रीय सहभागी असलेल्या महिला डॉक्टरला अज्ञात महिला डॉक्टर दाखवून हे प्रकरण रफादफा करण्यासाठी अविवेकी डॉक्टरची 'टीम' युद्धस्तरावर प्रयत्न करत असल्याची सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. या प्रकरणात पुढे काय होणार ? याकडे जागरूक जनतेचे लक्ष लागलेले आहे.

---

पंतप्रधान मोदींच्या इंधन बचत आवाहनाला मंत्री संजय राठोड कडुन हरताळ ...

# वाहनाचा ताफा, हेलीकॅाप्टरच्या वाफा!

## मंत्री संजय राठोडांचा पोहरादेवी दौरा ठरला चर्चेचा विषय

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले होते. यावर अनेक मंत्र्याकडून चांगलं प्रतिसाद दिलं गेलं होतं. मात्र आज मंत्री संजय राठोड यांच्या वाशीमच्या पोहरादेवी दौऱ्यातील ताफा पाहता मोदींच्या आवाहनाला मंत्री राठोड यांच्याकडून हरताळ फासला गेला आहे. त्यामुळे पंत प्रधान याचा आवाहन फक्त सर्व सामान्यांसाठी होता का, राज्याचे मृद व संधारण मंत्री राठोड यांना हा आवाहन लागु होत नाही का असा सवाल पोहरदेवीच्या दौऱ्यातुन उपस्थित केला जात आहे.







देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले होते. यावर अनेक मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. दरम्यान दि. ३० मे रोजी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड वाशिम जिल्ह्याच्या पोहरादेवी दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात मंत्री राठोड यांच्या हेलिकॉप्टरदौऱ्यासह शासकीय आणि खाजगी वाहनांचा मोठा ताफा पोहरादेवी येथे पाहायला मिळालं. दरम्यान माध्यमांनी मोदींच्या इंधन बचत आवाहनावर प्रश्न विचारले असता, मंत्री संजय राठोड म्हणाले 'आम्ही वाहनांचा ताफा अर्धा केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला आम्ही, सर्व मंत्री आणि मुख्यमंत्रीही प्रतिसाद देत आहोत,' असे त्यांनी सांगितले. मात्र प्रत्यक्षात संजय राठोड यांच्या नागपूर ते पोहरादेवी येथील ताफ्यात हेलिकॉप्टरसह सुमारे २५ ते ३० शासकीय वाहनासह खाजगी वाहने सुद्धा असल्याचे दिसून आले. जर मंत्री संजय राठोड यांचा हा ताफा अर्धा असेल, तर पूर्ण ताफा किती असावा असा प्रश्न त्या ताफ्यावरून उपस्थित झाला आहे.

# अवैध दारू विक्री धाब्यावर रोखणारी पथके फक्त कागदावर!

● खाजा शेख @रिसोड ●

**महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांनी सन २०२१ मध्ये अवैध दारू निर्मिती व विक्रीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात विशेष पथकाची नियुक्ती करून गावठी दारू तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. या उपक्रमामागील उद्देश सामाजिक स्वास्थ्य व सुरक्षितता जपणे, अवैध मद्यविक्रीला आळा घालणे आणि शासनाच्या महसुलात वाढ करणे हा होता.**

मात्र, वाशिम जिल्ह्यात हे पथक प्रत्यक्षात कार्यरत आहे की केवळ कागदोपत्री अस्तित्वात आहे, असा प्रश्न आता कायदेशीर परवानाधारक मद्यविक्रेते आणि सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. कारण जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये खुलेआम अवैध दारूची विक्री होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

पानटपऱ्या, चहाच्या टपऱ्या, किराणा दुकाने, धाबे तसेच काही हॉटेलांमधूनही अवैध मद्याची विक्री सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. असे असताना उत्पादन शुल्क विभागाच्या विशेष पथकाच्या कारवाईचा प्रभाव मात्र कुठेच दिसून येत नाही. कायदेशीररित्या शासनाचा महसूल भरून व्यवसाय करणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांमध्ये याबाबत नाराजी व्यक्त होत असून, अवैध विक्रीमुळे शासनाचा महसूलही मोठ्या प्रमाणात बुडत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यविक्रीविरोधातील



कारवायांची माहिती जाहीर करावी व संबंधित पथकाच्या कार्यक्षमतेबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. अवैध दारूविक्रीवर तातडीने प्रभावी कारवाई करून सामाजिक आरोग्य व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासनाने पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

---

# थोडक्यात

## अपंग प्रशिक्षण केंद्रात विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या प्रशिक्षण केंद्रामध्ये अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध तसेच मतिमंद मुला-मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे. विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रिक डोमेस्टिक अप्लायन्सेस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग (३ऊइ), कॉम्प्युटर अकौंटिंग व ऑफिस ऑटोमेशन तसेच अगरबत्ती, खडू व धूप बनविणे आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे.

इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी दि. ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर, जि. नांदेड येथे अर्ज सादर करावेत अथवा समक्ष भेट द्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## विदेशी वृक्षांच्या वाढत्या लागवडीमुळे जैवविविधतेला धोका; देशी झाडे लावण्याचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या प्रशिक्षण केंद्रामध्ये अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध तसेच मतिमंद मुला-मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे. विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रिक डोमेस्टिक अप्लायन्सेस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग (३ऊइ), कॉम्प्युटर अकौंटिंग व ऑफिस ऑटोमेशन तसेच अगरबत्ती, खडू व धूप बनविणे आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी दि. ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर, जि. नांदेड येथे अर्ज सादर करावेत अथवा समक्ष भेट द्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अवैध दारू विक्री बंद करा, अन्यथा आंदोलन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा लाड शहरातील एकवीरा मंदिर समोरील माळीपुरा परिसरात सुरू असलेल्या अवैध देशी-विदेशी दारू विक्रीविरोधात स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

परिसरातील नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, मागील काही महिन्यांपासून माळीपुरा भागात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामुळे सामाजिक व कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः युवक आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे दरम्यान, येत्या दोन दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास महिला, युवक व नागरिक लोकशाही



मार्गाने आंदोलन किंवा पोलीस स्टेशनवर मोर्चा काढतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. संबंधित अवैध धंदा नजूल जागेवर सुरू असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. दारूमुळे परिवारात महिलांवरील अत्याचार, घरगुती हिंसाचार, रात्रीच्या वेळी भांडणे व गुन्हेगारी वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, येत्या दोन दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास महिला, युवक व नागरिक लोकशाही मार्गाने आंदोलन किंवा पोलीस स्टेशनवर मोर्चा काढतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## शेतकरी व दिव्यांगांच्या मागण्यांसाठी मनसेचा रास्ता रोको

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी तसेच दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शुक्रवार, दि. २९ मे रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष मनीष भास्कर डांगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

या आंदोलनामध्ये शेतकरी व दिव्यांगांच्या विविध मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, दिव्यांगांना दरमहा सहा



हजार रुपये मानधन मंजूर करण्यात यावे, तसेच सक्षम वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारक लाभार्थ्यांना सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी तसेच दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास भविष्यात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. या आंदोलनात मा. शहराध्यक्ष रवी वानखडे, मा. शहराध्यक्ष गणेश इंगोले, अशोक इंगळे, फकीरा कर्डिले, गणेश खुणारे, मनविसे सरचिटणीस अमोल गाभणे, महेश देशपांडे, शाहरुख मांजरे, जुम्मा बेनीवाले, शुभम घोडे, हनुमान घोडे, धनीराम बाजड, लक्ष्मण वानखडे, संजयराव सरनाईक, रमेश चव्हाण, गुलाब मनोहर, सतीश कोकणे, शरद देशमुख, संतोष चौधरी, गजानन पांडे, अशोकराव सरनाईक, योगीराज लाडवेकर, संतोष पडघान, माधवराव देशमुख, वंदना पडघान, रामराव सरनाईक, गंगाराम खंडारे, अथर्व सरनाईक, सविता सरनाईक, कविता पुंड, लिलाबाई देशमुख, प्रवीण सपाटे, मीना लोटे, मंजुळा पुंड, कडूबा गुडदे, चंद्रभागा पांढरे, नथू पांढरे आदी महाराष्ट्र सैनिक व कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी आणि दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.

# भारतीय संस्कारप्रधान शिक्षणातून राष्ट्रनिर्मितीचा संदेश!

## विद्याभारती विदर्भ आचार्य प्रशिक्षण वर्गाचा प्रेरणादायी समारोप

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विद्या भारती विदर्भ आयोजित 'आचार्य प्रशिक्षण वर्ग-२०२६' चा समारोप कार्यक्रम गुरुवार, दि. २८ मे २०२६ रोजी रेखाताई राष्ट्रीय विद्यालय, वाशिम येथे उत्साहपूर्ण व संस्कारमय वातावरणात पार पडला. भारतीय संस्कृती, राष्ट्रभावना आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा संगम अनुभवायला मिळालेल्या या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नवोदय विद्यालय वाशिमचे प्राचार्य श्री.सचिनजी खरात तर प्रमुख वक्ते म्हणून विद्या भारती पश्चिम क्षेत्राचे मंत्री तथा महाराष्ट्र राज्य पाठ्यक्रम सुकाणू समितीचे सदस्य श्री.शेषाद्रीजी उपाख्य अण्णा डांगे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व वंदना गायनाने झाली. यावेळी आयोजकांनी प्रशिक्षण वर्गाच्या उद्दिष्टांची माहिती देत भारतीय संस्कारयुक्त शिक्षण व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. संयोजकांनी सादर केलेल्या विविध अहवालांमधून वर्गातील शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांचा आढावा घेण्यात






आला. वर्ग गीत, मनोगते आणि अनुभव कथनातून भारतीय शिक्षण पद्धतीबद्दलची आत्मीयता व राष्ट्रकार्याची प्रेरणा प्रभावीपणे व्यक्त झाली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विद्या भारती पश्चिम क्षेत्र मंत्री मा. श्री. शेषाद्रीजी उपाख्य अण्णाजी डांगे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, 'शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून राष्ट्रनिर्मितीचा शिल्पकार आहे. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा जागविण्याचे कार्य आचार्यांनी सातत्याने केले पाहिजे.' आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृतीची जोड आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभारती विदर्भ प्रांत अध्यक्ष सचिन जोशी होते. प्रमुख अतिथी म्हणून नवोदय विद्यालय, वाशिमचे प्राचार्य सचिन खरात उपस्थित होते. त्यांनी प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वी आयोजनाचे कौतुक करत शिक्षकांनी समाजाभिमुख शिक्षणाची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडावी, असे मत व्यक्त केले. मंचावर विद्याभारती विदर्भचे उपाध्यक्ष सत्यानंद कांबळे तसेच विद्या भारती वाशिम जिल्हाध्यक्ष अनिल धुमकेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमात विविध गटांनी सादर केलेली गीत, मनोगते आणि अनुभव कथन यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड. सत्यानंदजी कांबळे यांनी केले. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. राष्ट्रभक्ती, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश देणारा हा समारोप कार्यक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. हा प्रशिक्षण वर्ग यशस्वी करण्यासाठी रेखाताई राष्ट्रीय विद्यालयाच्या शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमास शहरातील मान्यवर नागरिक, आचार्य, प्रशिक्षणार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्गात महाराष्ट्र शासनाच्या त्रिभाषा सूत्र समितीच्या सदस्या डॉ. सौ. मधुश्रीताई सावजी, संभाजीनगर, देवगिरी प्रांताचे अध्यक्ष प्रा.विवेकजी काटदरे, जळगांव, क्षेत्रीय पदाधिकारी भाईजी उपाले, विदर्भ देवगिरी संघटन मंत्री शैलेशजी जोशी यांची विशेष सत्रे झालीत. आचार्य प्रशिक्षण वर्गाला आ. श्यामभाऊ खोडे, नगराध्यक्ष अनिलजी केंदले, लोकनेते राजूपाटील राजे, शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिलजी कवरखे, मुख्याधिकारी निलेशजी गायकवाड, उप शिक्षणाधिकारी कृष्णाजी बिरादार, माजी आमदार विधीज्ञ विजयराव जाधव, क्रीडाधिकारी किशोरजी बोंडे, उद्योजव रामदासजी चांदवाणी, बांधकाम सभापती राहुलजी तुपसांडे, माजी शिक्षण सभापती संतोषजी वानखेडे, शिक्षक पतसंस्थेचे विजयजी मनवर, आदर्श शिक्षिका मिनाताई मापारी, पत्रकार आतिशभाऊ देशमुख, धनंजयजी कपाले, चंद्रकांतजी लोहाणा, जिल्हा संघचालक अभियंता शंकरराव ढोबळे, विभाग कार्यवाह विक्रमजी वावरे, उद्योजक राजूभाऊ जितकर, शिवाजीराव वाटाणे, सरकारी वकील परमेश्वरजी शेळके, डॉ. जयश्रीताई गुट्टे, डॉ. श्रीकांतजी राजे, संस्थाचालक सुनीलजी कदम, ज्येष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब सावरकर, राष्ट्र सेविका समितीच्या विशाखाताई गोगरकर, नगर संघचालक दिपकदादा जहागिरदार, विहिंप जिल्हाध्यक्ष रामभाऊ देशपांडे इत्यादी मान्यवरांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्याभारती विदर्भ प्रांत सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा.दिलीपजी जोशी, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. विशालजी कोल्हे, जिल्हा मंत्री प्रा. श्रीकांतजी जोशी, वर्ग व्यवस्था प्रमुख प्रा. रमेशजी आरु, प्रा. संतोषजी बकाल, प्रा. रामेश्वरजी बाजड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवतोड मेहनत घेतली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. ३१ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## साखळी लंपास; अज्ञात दुचाकीस्वारांवर गुन्हा

**मलकापूर:** पतीसोबत दुचाकीने घरी परतत असलेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना २९ मे रोजी रात्री शहरातील बुलढाणा रस्त्यावरील साईनगर वळणाजवळ घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजयकुमार श्रीकृष्ण खंडेलवाल (वय ७५, रा. साईनगर) हे पत्नी सरलाताई खंडेलवाल यांच्यासह शहरातील विष्णूवाडी परिसरातील धार्मिक कार्यक्रम आटोपून दुचाकीने घरी परतत होते. रात्री सुमारे ८:१५ वाजण्याच्या सुमारास बुलढाणा रस्त्यावरील साईनगर वळणाजवळील फलकापासून काही अंतरावर असताना दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांचा पाठलाग केला. यातील एका आरोपीने दुचाकीचा वेग कमी करत सरलाताई खंडेलवाल यांच्या गळ्यातील मणी व मंगळसूत्र असलेली सुमारे २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी हिसकावून घेतली.

# आमसभेत गोंधळ; प्रशासकांसह 18 जणांविरूद्ध गुन्हा

### ◆ जलजीवन मिशनच्या प्रश्नावरून वाद वाढला!

प्रतिनिधी ३१ मे

**नांदुरा:** तालुक्यातील वडनेर भोलजी ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण आमसभेत गोंधळ झाल्याप्रकरणी दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी ग्रामपंचायत प्रशासकांसह एकूण १८ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे रोजी वडनेर भोलजी ग्रामपंचायत कार्यालयात सन २०२६-२७ या वर्षातील पहिली सर्वसाधारण आमसभा पोलिस बंदोबस्तात आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अखेरीस काही नागरिकांनी जाणीवपूर्वक गोंधळ घालून आरडाओरड केल्याचा आरोप ग्रामपंचायत प्रशासक सुनीता रवींद्र सातव यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.तक्रारीनुसार, राम शिवाजी बोराळे, राधेश्याम ज्ञानेश्वर सातव, शांताराम बेलोकार, योगेश मनोहर इंगळे, शालीग्राम तोताराम जुमडे, आशुतोष संतोष लेइंग, अजय बाबुराव लोखंडे, अन्सार शेख शेख मुश्ताक, फिरोज खान आरीफ खान, एजाज खान मिये खान, उमा बोचरे व इतरांनी बेकायदेशीर जमाव करून ग्रामसभेत गोंधळ घातला. तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील नोंदी व कागदपत्रांचे नुकसान करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.या तक्रारीवरून ग्रामपंचायत प्रशासक सुनीता सातव, रवींद्र सातव, देवीदास वाघ, ओम संतोष दिघे, अशपाक, संदीप बोचरे, संतोष दिघे, ऋषिकेश देशमुख, शेख करीम यांच्यासह अन्य व्यक्तींविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोलिस हवालदार शेख नवाज करीत आहेत. पुढील तपास पोलिस अंमलदार शेख नवाज करीत आहेत.शिवीगाळ करून धमकविल्याचा आरोप दुसऱ्या बाजूने उमा गोपाल बोचरे यांनीही तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेबाबत माहिती विचारल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासक सुनीता सातव व इतरांनी शिवीगाळ करून धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# मशागतीची कामे अंतिम टप्प्यात, नजरा आभाळाकडे; खरिपासाठी बळीराजा सज्ज!

### ◆ ‘रोहिणी नक्षत्राला प्रारंभः शेतशिवारात कामांना वेग
### ◆ बागायतदार शेतकरी मान्सूनपूर्व कपाशी पेरणीची तयारी करीत आहेत

प्रतिनिधी ३१ मे

**खामगाव:** मे महिन्याच्या कडक उन्हातही शेतकरी नव्या आशा आणि स्वप्नांसह पुन्हा शिवारात उतरला आहे. रोहिणी नक्षत्राच्या प्रारंभानंतर तालुक्यात खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून, मशागतीची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. दुष्काळ, अवकाळी पाऊस, अशा विविध संकटांचा सामना करूनही बळीराजा नव्या उमेदीने शेतात राबताना दिसत आहे.काही शेतकरी बैलजोडीच्या साहाय्याने वखरणीची कामे करत आहेत,



तर काही शेतकरी शेणखत टाकून जमिनीची मशागत करण्यात व्यस्त आहेत. उन्हाच्या तीव्र झळा सहन करत आणि डोळ्यांत पावसाची आस बाळगत शेतकरी दिवस-रात्र मेहनत घेत आहे. यंदा तरी पाऊस समाधानकारक पडावा, अशी अपेक्षा प्रत्येक बळीराजाच्या मनात आहे. कर्जाचे ओझे आणि शेतीचा वाढता खर्च या चिंता शेतकऱ्यांसमोर कायम आहेत.तालुक्यातील शेलोडी, आवार, अटाळी, जळका, पिंपळगाव राजा, भालेगाव, बोरजवळा आदी परिसरात शेतांमध्ये नांगरणी, वखरणी, शेणखत टाकणे तसेच पेरणीपूर्व तयारीची कामे सुरू आहेत.

# गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात !

### ◆ शेतकऱ्यांना खरीप हंगामापूर्व नियोजनाविषयी मार्गदर्शन

प्रतिनिधी ३१ मे

**जळगाव जामोद:** कृषी विभाग, आत्मा व जळगाव जामोद येथील कृषी विज्ञान केंद्राच्या संयुक्त विद्यमाने ’कृषी तंत्रज्ञानाचा जागर - खरीप हंगाम मोहीम २०२६’ अंतर्गत गुरुवार, २८ मे रोजी नगरपरिषदेच्या योगा हॉलमध्ये गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेत शेतकऱ्यांना खरीप हंगामपूर्व नियोजन व कपाशीवरील गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनविषयी मार्गदर्शन करण्यात आले. हवामान परिस्थितीचा शेतीवर वाढता परिणाम लक्षात घेता शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींसोबत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून वैज्ञानिक शेतीकडे वळावे, असे मत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन आमदार डॉ. संजय कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपर्णा कुटे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून कृषी उपविभागीय अधिकारी बाळासाहेब व्यवहारे उपस्थित होते. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सूरज जाधव यांचे कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ संजय उबाळे, तालुका कृषी अधिकारी रमेश जाधव यांनी खरिपाचे नियोजन, बदलत्या हवामानानुसार शेती पद्धतीत आवश्यक बदल करण्याची गरज अधोरेखित केली.

**महाविस्तार कृषी एआय ॲपविषयी माहिती**
कार्यक्रमात शासनाच्या ’महाविस्तार कृषी एआय’ ॲपची माहिती देत प्रत्येक शेतकऱ्याने हे ॲप डाउनलोड करून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या ॲपद्वारे हवामानाचा अंदाज, पीक सल्ला, रोग व्यवस्थापन आणि विविध कृषी योजनांची माहिती सहज उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात पीक संरक्षण उपायांचा प्रभावी वापर करून उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले.

# धरणातील गाळ वीटभट्ट्यांवर; महसूल विभागाचे दुर्लक्ष!

### शेतात टाकण्याच्या नावाखाली गाळाचा गैरवापर

प्रतिनिधी ३१ मे

**खामगाव:** तलाव, धरणे आणि लघू प्रकल्पांमधील पाणीसाठा कमी झाल्याने अनेक ठिकाणी गाळ उपसा करण्याची कामे सुरू आहेत. नियमानुसार काढलेला गाळ शेतकऱ्यांना शेतात वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होत असल्याने अनेक शेतकरी ट्रॅक्टरद्वारे गाळ वाहून शेतात टाकत आहेत; मात्र काही ठिकाणी गैर प्रकार होत असल्याने समोर आले आहे. शेतात टाकण्याच्या नावाखाली काही ट्रॅक्टरचालक धरणांमधील गाळ थेट वीटभट्ट्यांवर नेत असल्याचा गंभीर प्रकार घडत असल्याची चर्चा आहे. गाळाचा व्यावसायिक वापर करून त्यातून आर्थिक फायदा मिळवला जात आहे.या प्रकारामागे मोठे आर्थिक हितसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक व शेतकरी वर्गातून होत आहे.शासनाच्या नियमानुसार धरणे, तलाव आणि लघु प्रकल्पांमधील गाळ काढून तो शेतजमिनीत वापरण्यास परवानगी दिली जाते. या प्रक्रियेमुळे जमिनीची जलधारण क्षमता आणि सुपीकता वाढते. शेतकऱ्यांना ट्रॅक्टरद्वारे गाळ वाहून नेण्याची परवानगी दिली जाते; मात्र त्याचा वापर केवळ शेतीसाठीच अपेक्षित आहे.

**आवश्यक उपाययोजना**
गाळ वाहतुकीवर काटेकोर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहनांची नोंद, मार्ग तपासणी आणि ठरावीक ठिकाणीच उतराई यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# कदमापूर येथे अधिक मासानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

### अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता

प्रतिनिधी ३१ मे

**खामगाव:** तालुक्यातील कदमापूर येथे अधिक मासनिमित्त श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.या सप्ताहाला दि.२१ मे २०२६ पासून प्रारंभ झाला,संपूर्ण सप्ताहभर गावामध्ये धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. या सप्ताहात दररोज पहाटे काकडा आरती, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ तसेच रात्री कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध भागातून आलेल्या नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व महाराजांनी आपल्या प्रभावी वाणीमधून भक्तांना अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला.सप्ताहामध्ये ह.भ.प. किशोर महाराज काळे, ह.भ.प. पुखराज महाराज बावस्कार, विनोदाचार्य अरुण महाराज लांडे, ह.भ.प. साध्वी दुर्गाताई सोळंके, शिवव्याख्याकार शिवाजी महाराज झांबरे, रामायणाचार्य पंढरीनाथ महाराज देशमुख,



ह.भ.प. मधुकर महाराज जोगदंड तसेच ह.भ.प. गणेश महाराज हुंबाड यांचे कीर्तन व प्रवचन कार्यक्रम संपन्न झाले.

सप्ताहासाठी मार्गदर्शक म्हणून गुरुवर्य प्रेमनाथजी महाराज, ह.भ.प. विकास महाराज वाठोडी आणि ह.भ.प. देविदास महाराज यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच गायनाचार्य, मृदंगाचार्य आणि टाळकरी यांच्या सुमधुर भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.या श्रीमद्?? भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची गुरुवार दि.२८ मे २०२६ रोजी भक्तीमय वातावरणामध्ये उत्साहात सांगता झाली. याप्रसंगी हभप गणेश महाराज हुंबाड,महागाव यांचे सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत काल्याचे किर्तन पार पडले.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी या श्रीमद् भागवत सप्ताहाला भेट देवुन ग्रंथ पुजन केले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे खामगाव तालुकाध्यक्ष मनोज वानखडे,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे उपस्थित होते.यावेळी आयोजकांच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह इतर मान्यवरांचा शाल व पुष्पहार देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी हभप विलास महाराज वाटाणे, हभप देविदस महाराज बघे,कदमापूरचे माजी सरपंच पवन पवार,डॉ.भास्करराव भोसले,समाधानजी लेवाडकर,माधवराव दारमोडे, माणिकराव गव्हाळे, गोपाल गव्हाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी दररोज अन्नदान करणाऱ्या विविध दान दात्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजित महाप्रसादाचा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला.यावेळी सांगता कार्यक्रमानिमित्त गावातून ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य दिंडी काढण्यात आली. दिंडीत महिला, युवक, नागरिक आणि वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषाने कदमापूर परिसर दुमदुमून गेला. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील समस्त नागरिक, वारकरी मंडळी, युवकांनी परिश्रम घेतले.

# अल्पवयीन मुलांच्या तोंडी तंबाखू; आरोग्यासह भवितव्यही धोक्यात, सामाजिक दुष्परिणाम !

### आज जागतिक तंबाखू विरोधी दिन

प्रतिनिधी ३१ मे

**खामगाव:** तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण ही देशासमोरील गंभीर आरोग्य समस्या बनली अल्पवयीन असताना मुलांमध्ये वाढत असलेले तंबाखूचे व्यसन अधिक चिंताजनक ठरत आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक किशोरवयीन मुले कमी वयातच तंबाखू सेवनाकडे वळत असल्याचे चित्र असून, यामुळे त्यांच्या आरोग्याबरोबरच शैक्षणिक आणि सामाजिक जीवनावरही विपरीत परिणाम होत आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उत्सुकता, मित्रपरिवाराचा अनुकरणाची प्रभाव, प्रवृत्ती आणि तंबाखूची सहज उपलब्धता यामुळे अनेक मुले लहान वयातच या व्यसनाच्या आहारी जात आहेत. सुरुवातीला केवळ प्रयोग म्हणून सुरू झालेले सेवन पुढे सवय आणि नंतर व्यसनात रूपांतरित होते.किशोरवयातच वाढतो आजारांचा धोका! तंबाखूमधील निकोटीनमुळे तीव्र व्यसनाधीनता निर्माण होते. कमी वयात तंबाखू सेवन सुरू झाल्यास शरीर आणि मेंदूच्या विकासावर परिणाम होतो. तोंडाचे आजार, श्वसनविकार, स्मरणशक्ती कमी होणे तसेच भविष्यात कर्करोग व हृदयरोगाचा धोका वाढत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात.

**पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची !**
अल्पवयीन मुलांना तंबाखूपासून दूर ठेवण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुलांच्या वर्तनातील बदल ओळखणे, त्यांच्याशी संवाद साधणे, तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती देणे आणि शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.




# लाडकी बहीण योजनेतील ८० लाख लाभार्थींच्या केवायसी प्रकरणाची चौकशी करा; जावेद जकेरिया यांची मागणी

प्रतिनिधी ३१ मे

**अकोला:** राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवारचे प्रदेश संगटक सचिव जावेद जकरिया यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थीच्या पडताळणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

जकरिया यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सुरुवातीला सुमारे २ कोटी ४६ लाख महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आल्याची माहिती समोर आली होती. मात्र, केवायसी प्रक्रिया राबविल्यानंतर लाभार्थींची संख्या सुमारे १ कोटी ६६ लाखांवर आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे जवळपास ८० लाख महिलांच्या नोंदींबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

त्यांनी म्हटले आहे की, ज्या महिलांच्या बँक खात्यांमध्ये योजनेची रक्कम जमा झाली, त्यांची केवायसी का झाली नाही, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. ८० लाख महिलांची केवायसी न होणे ही राज्यासाठी अत्यंत गंभीर बाब असून यामागील वस्तुस्थिती जनतेसमोर येणे गरजेचे आहे.

जावेद जकरिया यांनी लक्ष वेधले की, ८० लाख महिलांना दरमहा १,५०० रुपये प्रमाणे लाभ दिल्यास शासनावर दरमहा सुमारे १,२०० कोटी रुपयांचा आणि वर्षाला सुमारे १४,४०० कोटी रुपयांचा खर्च येतो. त्यामुळे सार्वजनिक निधीच्या वापराबाबत संपूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात जकरिया यांनी सर्व लाभार्थींची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करावी, केवायसी न झालेल्या महिलांच्या नोंदींची विशेष तपासणी करावी, अपात्र अथवा बोगस लाभार्थी आढळल्यास त्यांच्याकडून रक्कम वसूल करावी तसेच गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अधिकारी, कर्मचारी किंवा इतर संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

राज्य शासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षाही जावेद जकरिया यांनी व्यक्त केली आहे.

# अंजनगाव येथे प्राविण्य प्राप्त १०५ विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पत्रकार बांधवांचा सत्कार सोहळा संपन्न

प्रतिनिधी ३१ मे

**अकोट:** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंजनगाव येथील श्री संत जगनाडे महाराज समाज मंदिर येथे क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या फोटो प्रतिमेचे सर्व पाहुण्यांच्या उपस्थित फुलपुष्प वाहून पूजन व दीप प्रज्वलन केले व रमेश बुंदिले माजी आमदार यांच्या हस्ते उद्घाटनाची फीत कापून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली . प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रम संपन्न कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन लवटे आमदार दर्यापूर मतदारसंघ, उद्घाटक अविनाश गायगोले, नगराध्यक्ष अंजनगाव

स्वागताध्यक्ष अतुल वाठ उपसभापती कृ उ बा स

मुख्य आयोजक स्वप्निल



बोबडे संस्थापक अध्यक्ष प्रमुख अतिथी रमेश बुंदीले मा आमदार, सुधीर रसे, सतीश हाडोळे, निलेश काळे, प्रवीण पेटकर, निलेश गोमासे, आशिष जांभोळे,गोविंद हाडोळे, किशोर बहादुरे, विशाल बोबडे, निशाताई गावंडे, नेमाडे गुरुजी, महेंद्र दिपटे, युवराज पवार, प्रशांत खाजोने, गौरव कविटकर, प्रकाश बागडे, महेंद्र डीपटे, आदी मान्यवर उपस्थित होते अध्यक्षीय भाषण गजानन लवटे आमदार यांनी केले तर रमेश बुंदिले , माजी आमदार,अतुल वाढ, सुधीर रसे ,प्रवीण पेटकर, सतीश हाडोळे देवानंद भुस्कट यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले, तर काही विद्यार्थी विद्यार्थ्यांनी आपापले मनोगत व्यक्त केले पाहुण्यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना शाल श्रीफळ ट्रॉफी व फुलपुष्पगुच्छ देऊन सत्कार सन्मानित करण्यात आले एकूण १०५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व पवन बेलसरे, प्रकाश बागडे, प्रभाकर बोरकर, महेंद्र भगत या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले कार्यक्रम देवानंद भुस्कट जिल्हाध्यक्ष, राजेश भगत जिल्हा उपाध्यक्ष, नितीन करूले, अनिल जांभळे, विलास सोनटक्के, सोनाली शेगोकर, वैशाली जावरकर, अतुल नाथे, सुनील काळे, आशिष बेलोकार, अतुल मुरेकार, विशाल काळे, सुमित गवळी, सर्विस सोनटक्के, श्रीकांत पवार, देवेश हाडोळे, आशिष बहादुरे, संदीप बेलसरे, चंद्रशेखर कांडलकर, पंकज मुरेकर, राजेंद्र सोनटक्के, अर्पण सोनटक्के, शाम व्यवहारे, रूपाली दहेकर, दिपाली बहादुरे, वर्षा भुयार, चित्रा रसे, अनुराधा भुस्कट, सुनिता अंबाळकर, पुनम बोबडे कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्निल बोबडे तर संचालन स्नेहा भुस्कट आभार देवानंद भुस्कट यांनी पार पाडले कार्यक्रमामधील सर्व उपस्थित त्यांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते महात्मा फुले ब्रिगेड संघटनेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरता अथक परिश्रम घेतले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते,

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. ३१ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# शासकीय कामात घरगुती गॅस सिलिंडरचा वापर !

प्रतिनिधी ३१ मे

**अकोला :** आखाती देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती तसेच इतर इंधनांच्या उपलब्धतेवर परिणाम झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

त्यातच गॅसचा तुटवडा असल्यामुळे घरगुती गॅसधारक व व्यावसायिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार होऊ नये, यासाठी जिल्ह्यात पथके स्थापन करून धाडसत्र राबवून अनेक व्यावसायिकांकडून घरगुती गॅस सिलिंडर जप्तीची कारवाई केली. मात्र आता शासकीय कामासाठीच घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त करीत प्रशासनावर बोट ठेवले आहे. हा प्रकार अग्रेसन चौकातील रोडवर पट्टे मारता घडला आहे. आता यावर प्रशासन काय कारवाई करते, याकडे शहरवासीयांचे डोळे लागले आहेत.

## ♦ अग्रसेन चौकातील प्रकार, प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह





### अत्यावश्यक वस्तू सेवा कायद्याचे सर्रास उल्लंघन

घरगुती वापरासाठी अनुदानित स्वरूपात उपलब्ध करून दिले जाणारे गॅस सिलिंडर व्यावसायिक अथवा शासकीय कामांमध्ये वापरणे हे अत्यावश्यक वस्तू सेवा कायद्याच्या नियमांचे उल्लंघन मानले जाते. त्यामुळे संबंधित कंत्राटदार तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरांमुळे सामान्य नागरिक त्रस्त असताना दुसरीकडे अत्यावश्यक इंधनांची काळाबाजारी आणि गैरवापर होत असल्याच्या तक्रारीही वाढू लागल्या आहेत. मात्र याकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आता नागरिकांकडून केला जात आहे. अकोला शहरातील अग्रसेन चौक परिसरात सुरू असलेल्या रस्ते विकास कामांदरम्यान झेब्रा क्रॉसिंग तसेच रस्त्यावरील पट्टे रंगविण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रणेजवळ पंतप्रधान उज्वला योजनेअंतर्गत घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलिंडर वापरले जात असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या कामासाठी तब्बल चार ते पाच घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. जिल्हा प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### कायदे फक्त सर्वसामान्यांसाठीच आहेत का?

सामान्य नागरिकांकडून घरगुती गॅसचा किरकोळ गैरवापर आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाते. मात्र शासकीय कामांमध्येच जर अशा प्रकारे घरगुती सिलिंडरचा वापर होत असेल, तर कायदे हे फक्त सर्वसामान्य नागरिकांसाठीच आहेत का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. 'दिव्याखाली अंधार' ही म्हण आता शासकीय विकास कामांच्या माध्यमातून प्रत्यक्षात दिसून येत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे

# विषारी दारूबळींनी पुणे हादरले

प्रतिनिधी ३१ मे

**अकोला :** पुणे जिल्ह्यात विषारी दारूच्या सेवनामुळे १८ जणांचा बळी गेल्यानंतर राज्यभरातील यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. अकोला जिल्ह्यात अवैध दारू विक्रीचा व्यवसाय अनेक वर्षांपासून खुलेआम सुरू असताना पोलिसांची मोठी मोहीम मात्र पुण्यातील दुर्घटनेनंतरच सुरू झाल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी धाडी टाकून ५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असले, तरी ही कारवाई आधी का झाली नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेने बार्शीटाकळी हद्दीतील ग्राम सिंदखेड मोरेश्वर येथे हाथभट्टीच्या दारू अड्ड्यावर दहा टाकून कारवाई केली असता संजय हरिलाल केवट राहणार कापशी रमेश पंचू केवट राहणार कापशी तसेच भिमराव दशरथ वानखडे राहणार सिंदखेड मोरेश्वर यांना अटक करीत टीन पत्र्याचे ८३ डबे, ज्यामध्ये प्रत्येकी १५ लिटर प्रमाणे एकूण १२४५ लिटर मोहा फुलाचा सड़वा, ५५ लिटर गावठी हातभट्टीची दारू, २०० लिटर क्षमतेच्या चार निळ्या प्लास्टिक टाक्या ५०० लिटर क्षमतेची एक रिकामी प्लास्टिक टाकी असा एकूण दोन लाख १७५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला पंचायत समक्ष नमुने वेगळे काढून उर्वरित अवैध दारू व साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले सदर प्रकरणी तिन्ही आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन बार्शी टाकळी येथे महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी कारवाई चानमी पोलिसांनी नवगाव शेत शिवारात कारवाई करीत विजय महादेव पांडे व जगदेव महादेव ससाने दोघेही राहणार नवगाव हे हातभट्टीची दारू गाळत असल्याचे आढळून आले कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ५८५ लिटर मोह फुलांचा सडवा ती स्टेटस गावठी दारू दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण ८४ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली.

## ♦ अकोला पोलिसांनाही दारूअड्डे दिसले





### शहरात गवळीपुरा तसेच बार्शीटाकळी तालुक्यात गावठी दारूचा महापूर

◆ अकोला शहरातील गवळीपुरा तसेच नायगाव परिसरात अनेक ठिकाणी गावठी दारू राजरोसपणे विकली जात आहे. तर दुसरीकडे बार्शीटाकळी तालुक्यातील दगड पारवा जमुना पिंपळखुटा आदी गावात घरोघरी गावठी दारू विकली जाते. देशी विदेशी दारू महाग झाल्याने दारू शौकीन गावठी दारू कडे वळले आहेत. शहरातून गावठी दारू घेण्यासाठी शौकीन ग्रामीण भागाकडे वळत आहेत या दारूमुळे पुण्यासारखी घटना घडल्यास त्याला कोण जबाबदार हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे हे पाहता शहरातील गवळीपुरा नायगाव तसेच बार्शीटाकळी तालुक्यातील ग्रामीण भागात खुलेआम सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर कड़क कारवाई करावी अशी मागणी होत आहे

# जिल्ह्यातील हजारो लाडक्या बहिणींचे अडकले पैसे

ई-केवायसीचे काम बंद
दररोज शेकडो महिलांची कार्यालयात गर्दी

प्रतिनिधी ३१ मे



**अकोला :** जिल्ह्यातील हजारो लाडक्या बहिणी, ज्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांचे पैसे अडकले आहेत. ई-केवायसीची अंतिम मुदत संपली आहे. बँक खात्यात निधी न आल्यामुळे लाडक्या बहिणी आता महिला व बाल विकास विभागाच्या कार्यालयात फेऱ्या मारत आहेत.

राज्य सरकारने लाभार्थी महिलांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत त्यांचे ई-केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. ज्या महिला लाभार्थ्यांचे ई-केवायसी चुकीचे होते, त्यांना सरकारने ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर, सरकारने ही अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवली. अपूर्ण ई-केवायसीमुळे जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांना निधी नाकारण्यात आला आहे. आता, या महिला लाभार्थी जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाला भेट देत आहेत. दररोज शेकडो महिला कार्यालयाला भेट देत आहेत.

### इन्कम टॅक्स रिटर्न

◆ ज्या महिला लाभार्थ्यांचे इन्कम टॅक्स रिटर्न समोर आले आहे, त्यांच्या खात्यातही दोन महिन्यांपासून पैसे जमा होणे थांबवण्यात आले आहे. कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, ही योजना इन्कम टॅक्स रिटर्न भरणाऱ्यांना लागू नाही.

### आम्ही काहीही करू शकत नाही.

◆ जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, ३० एप्रिलनंतर ई-केवायसी दुरुस्ती प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. ज्यांचे ई-केवायसी पूर्ण झालेले नाही, त्यांच्या खात्यात पैसे जमा होणे थांबले आहे. जोपर्यंत सरकार ई-केवायसी दुरुस्तीसाठी नवीन तारीख जाहीर करत नाही, तोपर्यंत प्रशासन काहीही करू शकत नाही. ई-केवायसी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय केवळ सरकारच घेऊ शकते. लाभार्थी दररोज कार्यालयात येतात, पण आम्ही स्वतःहून काहीही करू शकत नाही.

# खताचा बफर स्टॉक तातडीने उपलब्ध करा, अन्यथा ४ जूनला मोर्चा

प्रतिनिधी ३१ मे

## ♦ शिवसेना व प्रहारचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अकोट :** आपल्या जिल्हा मध्ये सर्व शेतकरी पेरणीच्या पूर्व तयारीला लागले आहेत अश्यात च पेरणी साठी लागणारे बीबियाने खते घेण्या करिता वाढत्या तापमानात ही शेतकरी मोठ्या संख्येने महिला, लहान मुले सकाळ पासून कृषी सेवा केंद्रा बाहेर रांगेत उभे असतात एवढ करूनही कृषी केंद्र चालक युरिया प्रत्येकी फक्त ५ बॅग देतात ते ही सुरवातीच्या ३० ते ४० शेतकऱ्यांना म्हणजे दिवसाला १५० ते २०० बॅग चा वाटप करतात उर्वरित शेकऱ्यांना रिकाम्या हातांनि घरी परत जावे लागते कारण विचारले तर आमच्या कडे जेवढा स्टॉक आला तेवढा वाटप झाल असे सांगता व पुन्हा दुसऱ्या दिवशी तेच शेतकऱ्यांचे होत असलेल हाल पाहून तर असे वाटते की भारत हा कृषी प्रधान देश आहे हे आता फक्त १५ ऑगष्ट व २६ जानेवारी च्या भाषणा पुरतेच आहे असे वाटते.

जिल्हात खताचा बफर स्टॉक उपलब्ध असताना सुद्धा फक्त शेतकरी कसा वेठीस धरला जाईल हाच उद्देश सर्व यंत्रणेचा आहे असे वाटते आपणास विनंती आहे जिल्ह्यात जो खताचा बफर स्टॉक आहे तो आपण ताबडतोब शेतकऱ्यानं साठी रिलीज करावा अन्यथा येत्या ४ जून आमदार वंदनीय बच्चू भाऊ कडू विधान परिषद यांच्या सह हजारो शेतकऱ्याच्या उपस्थितीत आपल्या कार्यालयावर भव्य शेतकरी मोर्चा काढण्यात येईल त्या नंतर होणाऱ्या सर्व बाबीची जबदारी ही आपली व शासनाची राहील याची नोंद घ्यावी

# मेलोडी चॉकलेट माळा गळ्यात टाकून घोषणाबाजी व तीव्र निषेध

प्रतिनिधी ३१ मे

## ♦ अकोट काँग्रेसचे पेट्रोल, डिझेल व गॅस दर वाढी विरोधात धरणे आंदोलन



**अकोट :** वाढती महागाई तसेच पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सतत वाढणाऱ्या दरांच्या निषेधार्थ अकोट शहर काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटी च्या संयुक्त विद्यमाने आज जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार अकोट येथील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर हे आंदोलन पार पडले. नवनियुक्त अकोला जि.काँ. कमिटीचे अध्यक्ष प्रकाश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या आंदोलनात काँग्रेस कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत तीव्र निषेध व्यक्त केला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी गळ्यात मेलोडी चॉकलेटच्या माळा घालून अनोख्या पद्धतीने मोदी सरकारचा निषेध नोंदवला. तसेच पेट्रोल पंपावर नागरिकांना मेलोडी चॉकलेटचे वाटप करण्यात आले. आंदोलनादरम्यान पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या वाढलेल्या किमती तात्काळ कमी करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. हे आंदोलन अकोट शहर काँ.कमिटीचे अध्यक्ष सारंग मालाणी व ता. काँ. क चे अध्यक्ष अनोख राहाणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी प्र. काँ. कमिटीचे महासचिव प्रशांत पाचडे, अचल बेलसरे नगरसेवक, रतन गुजर, पत्रकार संजय आठवले, डॉ. प्रमोद चोरे, निनाद मानकर, गजानन डाफे, नगर सेवक अजहर शेख, शेख ख्वाजा, बादल अहिर, सरफराज परवेज, महेबुब पटेल, अफजल खान, जमील भाई, कालू भाई, पत्रकार सैय्यद अहमद कादिर शाह, वैभव पाचडे, नुसरत अली, गोलू भगत, मिलिंद नितोने, रोशन चिंचोलकर, आमिर खान अहमद परवेज, शिवदास सावरकर, अब्दुल कलीम सिकलीकर, विवेक गणोरकर, निखिल झाडे, पप्पू ठेकेदार, केशव हेंड, आजम इनामदार, अथर जमादार आदिल अहमद, सुफियान देशमुख, आदित्य मुरकुटे, शेख अनीस, अनिल फुलंबरकर, नसीम शेख यांच्यासह अकोट शहर व तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरधाव कार झाडावर आदळून एकाचा मृत्यू, वाहनाचे नुकसान

## ♦ खामगाव-बुलढाणा मार्गावर भीषण अपघात

प्रतिनिधी ३१ मे

**खामगाव :** बुलढाणा मार्गावरील नांद्री शिवारात शुक्रवारी (दि. २९) भरधाव कार झाडावर आदळून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खामगाव शहरातील शौकत कॉलनी येथील तनवीर शहा कासम शहा (३४) हे बुलढाणा येथून कारने खामगावकडे परतत होते. दरम्यान, नांद्री फाट्याजवळ चालकाचे कारवरील नियंत्रण अचानक सुटले. यामुळे भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या यादातर जोरात आदलली अपघात इतका भीषण होता की वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले आणि जखमी अवस्थेतील तनवीर शहा यांना वाहनातून बाहेर काढले. त्यांना तातडीने उपचारासाठी खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच शौकत कॉलनी परिसरात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# ना साहित्य, ना योग्य नियोजन जनगणनेचे वास्तव

## ♦ २०२१मध्ये अपेक्षित असलेली भारताची जनगणना तब्बल पाच वर्षांनी करण्यात येत आहे

प्रतिनिधी ३१ मे

**कुटासा:** १६ मे २०२६ पासून जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ३४ मुद्द्यांच्या अनुषंगाने घरयादी व घरगणना करण्यात येत आहे. ही भारताची पहिली डिजिटल जनगणना असून त्यासाठी मात्र शिक्षकांचे मोबाईल व डाटा वापरण्यात येत आहे.

### पूरक साहित्य मिळाले नाही

सोशल मीडिया वरील अनेक रिल्स मधून जनगणना करणाऱ्या प्रगणकांना बॅग, टोपी, मार्कर पेन, डायरी यासह इतर साहित्य मिळाल्याचे दिसत असताना अकोट तालुक्यातील प्रगणकांना इतर पूरक साहित्यच देण्यात आलेले नाही .शिक्षकांनी स्वतः पेन व आयकार्ड होल्डर विकत घेऊन कामाला सुरुवात केली आहे.

### शिक्षकांना आर्थिक भुर्दंड

प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून जास्तीत जास्त शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर जनगणना करण्यासाठी १२.०चे अँड्रॉइड व्हर्जन आवश्यक आहे. परंतु अनेक शिक्षकांकडे हे व्हर्जन नसल्यामुळे त्यांना मोबाईल विकत घ्यावा लागला.

### नियोजनाचा अभाव

एका प्रगणकाला १५० ते २०० गणनाघरे देणे अपेक्षित होते. परंतु अकोट तालुक्यातील अकोली जहागीर ,अकोलखेड ,आसेगाव बाजार ,पारळा ,कुटासा व अकोट शहरातील काही भागात ,इतर काही गावांमध्ये ३०० च्या वर गणना घरे प्रगणकांच्या वाट्याला आलेली आहेत अशी माहिती समोर आली आहे.जनगणने सारख्या राष्ट्रीय कार्यात गावातील तलाठ्यांची भूमिका महत्त्वाची असताना या कामात प्रगणक म्हणून त्यांना मोठ्या प्रमाणात समाविष्ट करणे आवश्यक होते पण तसे झाल्याचे दिसत नाही. अतिरिक्त काम सोपवण्यातआल्यामुळे बऱ्याच प्रगणकांना ४५ ते ४७ डिग्री तापमानात दुपारी दोन वाजेपर्यंत उन्हातान्हात फिरून जनगणनेची कामे पूर्ण करावी लागत आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत पाच शिक्षकांनी जनगणनेच्या कामात आपला जीव गमावलेला आहे आणि त्यातील पहिलाच मृत्यू हा अकोला जिल्ह्यातील अरविंद जोध या शिक्षकांना हृदयविकाराचा धक्का आल्यामुळे झाला. प्रगणकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी अशी अपेक्षा अनेक प्रगनकांकडून चर्चेदरम्यान समोर येत आहे. तसेच त्यांना अनुकंपा व इतर विम्याचे लाभ देण्याची मागणी अनेक प्रगनकांकडून करण्यात येत आहे.

# मुर्तिजापूर नगर परिषदेत 'महाराजस्व समाधान शिबीर' संपन्न

प्रतिनिधी ३१ मे

## ♦ नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवांचा लाभ



**मूर्तिजापूर :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १)' अंतर्गत मुर्तीजापूर तालुक्यातील आठवे शिबीर २६ मे २०२६ रोजी मुर्तीजापूर नगर परिषद कार्यालय येथे उत्साहात पार पडले. अकोल्याच्या जिल्हाधिकारी मा. वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली हे आयोजन करण्यात आले होते. आमदार हरिष मारोतीआप्पा पिंपळे यांनी शिबीर स्थळाला भेट देऊन समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष हर्षल रामेश्वर साबळे होते. तर उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे आणि मुख्याधिकारी निलेश जाधव भाजप गटनेते गजानन नाकट, यांच्या प्रमुख उपस्थितीत व विविध नगरसेवक, समाजसेवकांच्या सहभागाने हा सोहळा संपन्न झाला. २५ स्टॉल्सचे आयोजन नागरिकांच्या सोयीसाठी महसूल, पुरवठा, संजय गांधी योजना, महावितरण, आरोग्य, भूमी अभिलेख, कृषी, नगर परिषद आणि आधार यांसारख्या विविध विभागांचे एकूण २५ स्टॉल्स लावण्यात आले होते. एकाच ठिकाणी अनेक सेवा नागरिकांना डिजिटल सेवा, ई-फेरफार, ई-मोजणी, अभिलेख दुरुस्ती, प्रमाणपत्र वितरण व महसुली मार्गदर्शन एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले. कर्ज आणि दाखल्यांचे वाटप केंद्र सरकारच्या 'पीएम स्वनिधी' योजनेअंतर्गत १० पथविक्रेत्यांना कर्ज मंजुरी आदेश, तसेच नगर परिषदेमार्फत जन्म दाखल्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय ४ महिला बचत गटांना राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत तब्बल ६ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.तात्काळ तक्रार निवारण . उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी सर्व कार्यालय प्रमुखांकडील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच शिबीरात प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा तातडीने निपटारा करून अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्व विभाग प्रमुखांना दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार शिल्पा बोबडे यांनी केले, सूत्रसंचालन राजेश भुगूल यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी निलेश जाधव यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांनी आगामी काळातील सर्व शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK